cmyk


## संपादकीय

## संभ्रमातील बळीराजाला अचूक सल्ल्याची गरज

'जगावं की मरावं' असा प्रश्न 'नटसम्राटा'ला पडला होता, तशीच काहीशी दोलायमान परिस्थिती सध्या शेतकऱ्याची झाली आहे. शेतीसाठी अनुकूल हवामान अत्यंत आवश्यक असते. मात्र, गत काही वर्षांत हवामानातील अनिश्चिततेमुळे शेतकऱ्यांचे गणित वारंवार चुकत आहे. यंदा तर त्याचा कहर झालेला दिसतो. मे महिन्यात अवकाळी पावसाने दमदार हजेरी लावल्याने काही भागात ढगफुटीसदृश पाऊस, गारपीट तर काही भागात वादळवाऱ्याने पिकांचे अतोनात नुकसान केले.


# दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com


बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–३७ | शनिवार, दि.३१ मे २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## थोडक्यात...

### भारताचा जीडीपी विकास दर घसरला

नवी दिल्ली–२०२४–२५ या आर्थिक वर्षाच्या जानेवारी–मार्च तिमाहीत भारताचा जीडीपी विकास दर ७.४ टक्क्यांपर्यंत घसरला. गेल्या वर्षी याच तिमाहीत ८.४ टक्के होता. त्याच वेळी, सरकारी आकडेवारीनुसार, २०२४–२५ या आर्थिक वर्षात जीडीपी वाढीचा दर ६.५ टक्क्यांपर्यंत घसरला, जो मागील आर्थिक वर्ष २०२३–२४ मध्ये ९.२ टक्के होता.

### धाराशिव जिल्ह्यात सर्वाधिक पाऊस

धाराशिव–राज्यात गेल्या २४ तासांमध्ये (३० मे सकाळपर्यंत) धाराशिव जिल्ह्यात सर्वाधिक ४२.२ मिमी पाऊस झाला आहे. तसेच मराठवाड्यातील बीड जिल्ह्यात २४ मिमी पाऊस बरसला आहे. जालन्यात १३.९ मिमी पावसाची नोंद करण्यात आली आहे. तर पश्चिम महाराष्ट्रातील सोलापुरात १२.१ मिमी पाऊस झाला. तर कोकणातील सिंधुदुर्ग जिल्ह्यात ११.२ मिमी पावसाची नोंद झाली आहे.

### आमच्याकडे कोणीही नाराज नाही : जयंत पाटील

मुंबई–राष्ट्रवादी शरद पवार पक्षामध्ये कोणीही नाराज नाहीत, सर्व खुश आहेत. सर्व आपली कामे करत आहे, असे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी स्पष्ट केले आहे. पक्षात कसलेही मतभेद नसून फक्त माध्यमांनी काही बातम्या केल्या आहेत. याबाबत शरद पवार पाहतील आणि निर्णय घेतील असा खुलासाही जयंत पाटील यांनी सांगलीत बोलताना केला.

### गोकुळ दूधमहासंघाच्या अध्यक्षपदी नाविद मुश्रीफ

मुंबई–गोकुळच्या अध्यक्षपदावरून नेत्यांमध्ये आता चांगलीच रस्सीखेच बघायला मिळाली. नव्या अध्यक्षपदी हसन मुश्रीफ यांचा मुलगा नाविद मुश्रीफची निवड झाली आहे.

### राजनाथ सिंह यांची युद्धनौका आयएनएस विक्रांतला भेट

नवी दिल्ली–राजनाथ सिंह यांनी विमानवाहू युद्धनौका आयएनएस विक्रांतला भेट दिली आहे. आयएनएस विक्रांत भारतातील पहिली स्वदेशी विमानवाहू युद्धनौका आहे. ऑपरेशन सिंदूर दरम्यान आयएनएस विक्रांत अरबी समुद्रात तैनात होती.

### 'अलमट्टी'तून १० हजार क्युसेक विसर्ग

सांगली: पाणलोट क्षेत्रात मॉन्सूनपूर्व पावसाची शक्यता असल्याने अलमट्टी धरणातून बुधवारपासून १० हजार क्युसेकचा विसर्ग सुरू करण्यात आला आहे. पावसाचा जोर वाढल्यास हा विसर्ग वीस हजार क्युसेकपर्यंत वाढवण्यात येणार असल्याची माहिती अलमट्टी धरण प्रशासनाकडून देण्यात आल्याची माहिती पाटबंधारे विभागाने दिली.

# शेतकऱ्यांच्या नुकसान भरपाईसाठी शासन निर्णय आला

## राज्याच्या विविध भागात शेतकऱ्यांचे आतोनात नुकसान

**पुणे । प्रतिनिधी**

**राज्यात नुकत्याच अवेळी पावसामुळे, अतिवृष्टी व पुरामुळे झालेल्या शेती पिकहानी संदर्भात मंत्रिमंडळ बैठकीत चर्चा होऊन राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण यांच्या निर्देशाप्रमाणे निविष्ठा अनुदान देण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्याचा शासनादेश निर्गमीत करण्यात आला आहे.**

प्रस्तुत विषयी, खरीप–२०२५ पासून विहित नैसर्गिक आपत्तीमुळे होणाऱ्या नुकसानीकरिता द्यावयाच्या निविष्ठा अनुदान व तातडीने पंचनामे करण्याच्या सूचना निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. राज्य शासनाने नैसर्गिक आपत्तीमध्ये होणाऱ्या नुकसानीबाबत आपतग्रस्तांना द्यावयाच्या मदतीबाबत शासन निर्णय महसूल व वन विभाग अन्वये राज्य आपत्ती प्रतिसाद निधीचे मदतीचे दर विहित केले आहेत. प्रस्तुत निकष व दरानुसार निविष्ठा अनुदान देण्याबाबत केंद्र शासनाच्या सूचना आहेत. राज्यात उद्भवणाऱ्या विविध नैसर्गिक आपत्तीमध्ये बाधित होणाऱ्या नागरिकांना मदत देण्यासाठी आपत्ती



व्यवस्थापन अधिनियम, २००५ मधील कलम ४८ (२) अन्वये राज्य आपत्ती प्रतिसाद निधीची स्थापना करण्यात आली आहे. या निधीमध्ये केंद्र शासनाकडून ७५ टक्के व राज्य शासनाकडून २५ टक्के या प्रमाणे अंशदान दिले जाते. राज्य आपत्ती ◀◀ पान २ वर

### शेती पिक हानी संदर्भात शासनाने घेतलेला निर्णय पुढीलप्रमाणे

१) अवेळी पाऊस, अतिवृष्टी/पुरामुळे झालेल्या शेती पिक नुकसानीचे पंचनामे तात्काळ करण्यात यावेत. २) खरीप २०२५ व या पुढील कालावधीकरिता केंद्र/राज्य शासनाने अधिसूचित केलेल्या नैसर्गिक आपत्तींमुळे झालेल्या शेती पिक नुकसानीबाबत द्यावयाचे निविष्ठा अनुदानाचे दर व निकष शासन निर्णय प्रमाणे देय राहतील. ३) शासन निर्णय दि.०१.०१.२०२४ अन्वये दिलेल्या सूचना अधिक्रमित करण्यात येत आहेत. ४) प्रस्तुत आदेशाची तात्काळ प्रभावाने अंमलबजावणी करण्यात यावी.

# बीएसएफने पाकच्या ११८ चौक्या केल्या नष्ट

## अमित शाहा यांना सांगितला थरार

**श्रीनगर । प्रतिनिधी**

**ऑपरेशन सिंदूरदरम्यान सीमासुरक्षा दलाच्या (बीएसएफ) जवानांनी पाकिस्तानच्या गोळीबाराला चोख प्रत्युत्तर देत पाकच्या जम्मू येथील सीमेवरील तब्बल ११८ चौक्या नष्ट केल्या, अशी माहिती केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी शुक्रवारी पूँच येथे दिली. या कामगिरीबद्दल त्यांनी सीमा सुरक्षा दलाच्या जवानांचे अभिनंदनही केले.**

'बीएसएफच्या जवानांनी शत्रूची टेहळणी यंत्रणा पूर्णपणे नष्ट केली. ही यंत्रणा उभारण्यासाठी पाकिस्तानला तब्बल पाच वर्षे लागली होती,'' असे शहा यांनी सांगितले. ऑपरेशन सिंदूर नंतरचा शहा यांचा हा येथील पहिलाच दौरा आहे. जम्मू–काश्मीरमधील पूँच येथे पाकिस्तानने केलेल्या गोळीबारात मृत्युमुखी पडलेल्या नागरिकांच्या नातेवाईकांना शहा यांच्या हस्ते शुक्रवारी



नियुक्तीपत्रांचे वाटप करण्यात आले. सरकारी नोकरीने मृतांच्या कुटुंबीयांचे दुःख कमी होणार नसले तरी सर्व देश तुमच्या पाठीशी आहे, असा संदेश यातून देण्यात येत आहे, असे शहा यावेळी म्हणाले. पूँच येथे आयोजित कार्यक्रमात शह म्हणाले की, ◀◀ पान २ वर

## महिला आयोगाने दखल घ्यायला हवी होती-पंकजा मुंडे

**पुणे । प्रतिनिधी**



**वैष्णवी हगवणे आत्महत्या प्रकरण आणि याबाबतच्या इतर घडामोडीच्या अनुषंगाने आता मंत्री पंकजा मुंडे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. मंत्री पंकजा मुंडे म्हणाल्या की, वैष्णवी हगवणेला न्याय मिळावा यासाठी प्रत्येक पाऊल उचलणे गरजेचे आहे. या प्रकरणाबाबतचा सर्व निर्णय मुख्यमंत्री घेतील, असे मंत्री पंकजा मुंडे यांनी म्हंटले आहे. तर तक्रार कुठलीही असली तरी महिला आयोगाने दखल घेणे क्रमप्राप्त आहे, असेही यावेळी बोलताना मुंडे यांनी म्हंटले आहे.**

वैष्णवी हगवणेने सासरी हुंड्यासाठी होणाऱ्या छळाला कंटाळून आत्महत्या केली होती. त्यानंतर तिच्या सासरच्या मंडळींची अनेक प्रकरणे उघड झाली आहेत. वैष्णवीच्या माहेरच्या लोकांनी हगवणे कुटुंबावर अनेक गंभीर आरोप केलेले असून, त्यांना अटक देखील करण्यात आली आहे. या संपूर्ण प्रकारानंतर राज्यभरतून संताप व्यक्त केला जात आहे. वैष्णवीच्या मोठ्या जावेने राज्य महिला आयोगाकडे स्वत:वर होणाऱ्या छळाची तक्रार देखील केली होती. ◀◀ पान २ वर

## बिंदुसरा धरणात अतिवृष्टीमुळे निर्माण झालेल्या धोक्याविषयी तातडीने उपाययोजना करावी-अनिल जगताप



**बीड । प्रतिनिधी**

मागील काही महिन्यांतील अतिवृष्टीमुळे बिंदुसरा धरण ओसंडून वाहत आहे. त्यामुळे बीड शहरासह परिसरातील नागरिकांच्या सुरक्षेला धोका निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर नागरिकांचे जीवित आणि मालमत्तेचे नुकसान टाळण्यासाठी तातडीने उपाययोजना करण्याची मागणी शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी बीड जिल्हाधिकारी आणि नगर परिषद बीडचे मुख्याधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. या निवेदनामध्ये धरण परिसरात प्रवेशबंदी करावी, धरणातून सोडण्यात येणाऱ्या पाण्याचे नियोजनबद्ध नियमन करावे, नागरिकांना पूर्वसूचना देण्यासाठी यंत्रणा सज्ज ठेवावी, संभाव्य पूरग्रस्त ◀◀ पान २ वर

## राजकारणात जमीनदारी चालणार नाही; पंतप्रधान मोदींनी आपल्याच नेत्यांना फटकारले

**पाटणा । वृत्तसंस्था**

**भाजपमध्ये कार्यकर्त्यांना प्राधान्य दिले जाईल. तुम्ही नाही तर तुमचा मुलगा' ही मानसिकता स्वीकारली जाणार नाही. घराणेशाही आणि जमीनदारी वृत्तीला भाजपमध्ये थारा नाही, अशा शब्दात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्याच नेत्यांना फटकारले.**

पंतप्रधान मोदी दोन दिवस बिहारच्या निवडणूक दौऱ्यावर होते. पहिल्या दिवशी पाटणा येथील भाजप प्रदेश कार्यालयात खासदार, आमदार आणि पक्षाच्या पदाधिकाऱ्यांसोबत बैठक घेतली. सुमारे ७० मिनिटे चाललेल्या या बैठकीत



पंतप्रधान मोदींनी नेत्यांशी संवाद साधला आणि आगामी बिहार निवडणुकीसाठी विजयाचा मंत्र दिला. निवडणुका आल्या की लोक ◀◀ पान २ वर

## वैष्णवी हगवणे प्रकरणातील फरार निलेश चव्हाण नेपाळ सीमेवरून अटक

**पुणे । प्रतिनिधी**

**वैष्णवी हगवणे आत्महत्या प्रकरणात मोठी अपडेट समोर आली आहे. फरार आरोपी निलेश चव्हाणला अखेर पोलिसांनी नेपाळच्या सीमेवरून शुक्रवारी (३० मे) अटक केली. पिंपरी– चिंचवड पोलिसांनी ही कारवाई केली. वैष्णवीच्या कुटुंबियांना पिस्तुलाचा धाक दाखवून धमकावल्याच्या**



**आरोपाखाली तो गेल्या आठवड्याभरापासून फरार होता. पिंपरी–चिंचवड आणि पुणे पोलिसांची एकूण सात पथके त्याचा शोध घेत होती.**

वैष्णवी हगवणे (वय २४) हिने १६ मे रोजी भुकूम येथील सासरच्या घरी गळफास लावून आत्महत्या केली होती. तिच्या सासरच्या मंडळींकडून शारीरिक आणि ◀◀ पान २ वर

## ...तर अमोल मिटकरी आणि अजित पवारांच्या अंगावर कपडे राहणार नाहीत



### ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांची खोचक टिका

**पुणे । प्रतिनिधी**

ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर जोरदार टीका करत त्यांना 'पोल्ट्री फार्मवाले' संबोधले. गेल्या २० वर्षांपासून अर्थखात्याला चिकटून बसलेल्या अजित पवारांनी भटके–विमुक्त आणि मागासवर्गीय महामंडळांना '५० पैसेही' दिले नसल्याचा आरोप हाके यांनी केला. अजित पवार गटाचे आमदार अमोल मिटकरी यांनी हाके यांच्या फॉर्च्यूनर गाडीवरून टीका केली होती, त्याला प्रत्युत्तर देताना हाके यांनी मिटकरींना 'बाजारू विचारवंत' म्हणत, ''मी त्यांच्या भाषेत ◀◀ पान २ वर

# सरकारी लाडक्या बहिणींना योजनेतून डिच्चु

## मंत्री अदिती तटकरे यांची माहिती; २२८९ महिला कर्मचाऱ्यांनी केली नोंदणी

**मुंबई । प्रतिनिधी**

**चक्क सरकारी महिला कर्मचारी देखील लाडकी बहीण योजनेचा लाभ घेताना आढळून आल्या आहेत, अशा कर्मचाऱ्यांना आता या योजनेतून वगळण्यात आले आहे. याबाबत मंत्री अदिती तटकरे यांनी माहिती दिली असून आतापर्यंत राज्यात २२८९ सरकारी महिला कर्मचाऱ्यांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी नाव नोंदणी केल्याचे उघड झाले आहे.**

ज्या कुटुंबांचे आर्थिक उत्पन्न हे अडीच लाखांच्या आत आहे, अशा



कुटुंबातील महिलांसाठी राज्य सरकारने मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना सुरू केली आहे, ही एक राज्य सरकारची महत्वकांक्षी योजना आहे, या योजनेंतर्गत लाभार्थी महिलांच्या बँक खात्यामध्ये दर महिन्याला दीड हजार रुपये जमा करण्यात येतात. मात्र ही योजना सुरू करतानाच या संदर्भात सरकारने काही अटी घातलेल्या होत्या, या अटीमध्ये न बसणाऱ्या महिला देखील मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचा लाभ घेताना दिसून येत आहेत, या संदर्भात आता शासनाने मोठा निर्णय घेतला आहे.

लाभार्थी महिलांच्या अर्जाची पडताळणी करण्यात येत आहे, ज्या महिला या योजनेच्या अटींमध्ये बसत नाहीत त्यांचा अर्ज बाद ठरवला जात आहे, त्यांना या योजनेतून वगळण्यात येत आहे. अनेक महिलांचे उत्पन्न हे अडीच लाखांपेक्षा जास्त असताना तसेच नावावर घर आणि चारचाकी वाहन ◀◀ पान २ वर

### दोन लाख अर्जांची पडताळणी

लाभार्थ्यांची पडताळणी ही कोणत्याही योजनेच्या अंमलबजावणीतील सर्वसाधारण व नियमित प्रक्रिया आहे. या प्रक्रियेत सेवार्थ मधील जवळपास २ लाख अर्जांची पडताळणी केल्यानंतर त्यात सुमारे २२८९ सरकारी कर्मचाऱ्यांनी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी नाव नोंदणी केल्याची बाब जानेवारी– फेब्रुवारी दरम्यानच लक्षात आली असून तेव्हापासून अशा व्यक्तींना कोणताही लाभ वितरित करण्यात आलेला नाही.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.३० मे २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: २३.५० क्विंटल | २,४०१ | २,७४१ | २,६१० |
| ज्वारी/हायब्रिड: ३३.५० क्विंटल | २,००० | २,६०० | २,३०२ |
| मका/लोकल: ३३.५० क्विंटल | ५,३०१ | ६,७०० | ६,४१७ |
| तूर : १९.५० क्विंटल | ६,५०० | ६,५२६ | ६,५०६ |
| उडीद : १.०० क्विंटल | ५,४०० | ५,४०० | ५,४०० |
| बाजरी: ३३.०० क्विंटल | २,००० | २,६०० | २,३८६ |
| मुग : ०.५० क्विंटल | ६,००० | ६,००० | ६,००० |
| सोयाबीन: १६.५० क्विंटल | ४,२०० | ४,२०० | ४,२०० |
| हरभरा: १.५० क्विंटल | ५,४०० | ५,४०१ | ५,४०० |

cmyk

## अग्रलेख

# संभ्रमातील बळीराजाला अचूक सल्ल्याची गरज

'जगावं की मरावं' असा प्रश्न 'नटसम्राटा'ला पडला होता, तशीच काहीशी दोलायमान परिस्थिती सध्या शेतकऱ्याची झाली आहे. शेतीसाठी अनुकूल हवामान अत्यंत आवश्यक असते. मात्र, गत काही वर्षांत हवामानातील अनिश्चिततेमुळे शेतकऱ्यांचे गणित वारंवार चुकत आहे. यंदा तर त्याचा कहर झालेला दिसतो. मे महिन्यात अवकाळी पावसाने दमदार हजेरी लावल्याने काही भागात ढगफुटीसदृश पाऊस, गारपीट तर काही भागात वादळवाऱ्याने पिकांचे अतोनात नुकसान केले. हवामानातील या बदलामुळे शेतकरी गोंधळून गेला आहे.

पारंपरिक पद्धतीनुसार मे अखेरपर्यंत शेतकरी पेरणीसाठी मशागतीत मग्न असतो. परंतु यंदा एप्रिल अखेरपासूनच अवकाळी पावसाने थैमान घालण्यास सुरुवात केल्याने शेतकऱ्याला शेतीची मशागत करण्यास वेळच मिळाला नाही. शेतात कमालीचा ओलावा असल्याने नांगरणी करता आली नाही. हवामान खात्याचे अंदाजही अनेकवेळा चुकीचे ठरतात, त्यामुळे अचूक निर्णय घेणे शेतकऱ्यांना अवघड जाते. तो कायम द्विधा मन:स्थितीत असतो. या पार्श्वभूमीवर कृषि विभाग, कृषि विद्यापीठ व सरकारने शेतकऱ्यांना योग्य वेळी अचूक आणि त्या त्या भागातील हवामानानुसार सल्ला देणे ही काळाची गरज आहे. शेतकऱ्यांच्या हतबलतेचा फायदा घेऊन बोगस बियाणे, खते विक्री करणाऱ्या टोळ्याही सक्रिय होतात. सरकारने त्यांचा बंदोबस्त करणे आवश्यक आहे. तसेच शेतकऱ्यांना विश्वासार्ह मार्गदर्शन करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. अवकाळी पाऊस केवळ एक हवामान घटक नसून तो शेतकऱ्यांच्या कष्टांवर, भविष्यावर आणि स्वप्नांवर परिणाम करणारा महत्त्वाचा मुद्दा आहे. सध्या शेतकऱ्यासमोर 'पेरावं की थांबावं' असा गहन प्रश्न उभा आहे. त्याचे उत्तर देण्यासाठी हवामानावरील संशोधन, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आणि शाश्वत कृषि धोरण राबवायची गरज आहे. 'नेमेचि येतो मग पावसाळा' ही म्हण आता वापरून गुळगुळीत झाली असली तरी सरकार आणि प्रशासन त्यापासून बोध कधी घेणार हा प्रश्न अनुत्तरितच आहे.

राज्यात यंदा मान्सूनने १२ दिवस आधीच हजेरी लावली. उत्तर महाराष्ट्रात पावसाने धुमाकूळ घातला. २६ मे रोजी मान्सून राज्यात दाखल झाल्यानंतर आता तो सर्वच भागात पसरला आहे. पुढील काही दिवसांतील पावसाच्या प्रवासाबाबत पुणे वेधशाळेने म्हटले आहे की, बंगालच्या उपसागरात तयार झालेला कमी दाबाचा पट्टा आता उत्तरेला सरकल्यामुळे महाराष्ट्रात पुढील पाच ते सहा दिवसांत पाऊस विश्रांती घेण्याची शक्यता आहे. ३० मे नंतर मान्सूनचा प्रवास ओसरण्याची शक्यता आहे. पुढील दोन दिवसांत पावसाचा प्रवास थंडावणार असल्यामुळे शेतकऱ्यांनी पेरणीची घाई करू नये. १०० मिमी पाऊस होईपर्यंत शेतकऱ्यांनी पेरणी करू नये, असे हवामान विभागाने म्हटले आहे. यंदा सरासरीपेक्षा अधिक पाऊस कोसळेल असा अंदाज आहे. यावेळी ११० टक्क्यांच्या जवळपास पावसाचे प्रमाण राहू शकते, तसेच देशाच्या दक्षिण आणि मध्य भागात अधिक पाऊस होण्याची शक्यता आहे. पहिल्याच पावसाने राज्यातील अनेक जिल्ह्यांत मोठे नुकसान केले आहे. आता मान्सून मराठवाडा आणि विदर्भात पोहोचला आहे. दोन्ही भागात मुसळधार पाऊस होईल असा अंदाज आहे. त्यावेळी शेतकऱ्यांनी नांगरणी, वखरणीची कामे उरकून घ्यावीत आणि पुढे जमिनीत पुरेसा ओलावा आल्यानंतरच पेरणीचा निर्णय घ्यावा असे हवामान अभ्यासकांनी म्हटले आहे.

पावसात सातत्य राहणार की खंड पडणार याकडे सध्या शेतकऱ्यांचे लक्ष आहे. कृषि विभागाने मात्र पेरणीची घाई करू नये असा सल्ला दिल्याने गोंधळ वाढला आहे. खरीप हंगामासाठी एप्रिलमध्ये तयारी सुरू होते. परंतु यंदा या कालावधीतच पाऊस सुरू झाल्याने शेतकऱ्यांना मशागतीची संधीच मिळाली नाही. त्यामुळे सध्या जगाच्या पोशिंद्यासमोर 'पेरावं की थांबावं' असा प्रश्न असून यासाठी त्याला योग्य आणि बिनचूक सल्ल्याची गरज आहे.

# पंकजाताई मुंडे यांच्या पुढाकारातून पुण्यश्लोकअहिल्यादेवी होळकर जयंतीनिमित्त पशुसंवर्धन विभागामार्फत विविध कार्यक्रमांचे आयोजन

**मुंबई । प्रतिनिधी**

**पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे कार्य, विचार आणि प्रेरणादायी जीवनगाथा जनसामान्यांपर्यंत प्रभावीपणे पोहचविणे आवश्यक असल्याने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंती दिनाचे औचित्य साधून दि. ३१ मे २०२५ रोजी पशुसंवर्धन विभागामार्फत राज्यभर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी दिली आहे.**



पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर या भारतीय इतिहासातील एक तेजस्वी, कर्तबगार व दूरदृष्टी असणा-या स्त्रीशक्तीचे प्रतिक आहेत. त्यांनी धार्मिक सहिष्णुता, समाजकल्याण, सार्वजनिक बांधकाम, न्यायप्रविष्ठ प्रशासन आणि स्त्री शिक्षणाच्या माध्यमातून आदर्श राज्यकारभाराची उभारणी केली. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे कार्य समाजसेवा, धर्मनिष्ठा आणि कुशल प्रशासनाचे प्रतीक असून, ते महाराष्ट्र राज्याच्या प्रगत व उन्नत वाटचालीसाठी नेहमीच पथदर्शी ठरले आहे. यास अनुसरुन ''पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर'' यांच्या ३०० व्या जयंती वर्षानिमित्त पशुसंवर्धन विभागामार्फत अधिनस्त संस्थांमध्ये कार्यालय/ दवाखाना परिसर स्वच्छता व सुशोभिकरण करणे, गाव पातळीवर वंधत्व / सर्वोपचार शिबिरांचे आयोजन करणे, फिरस्ती मेंढपाळांची भेट घेऊन त्यांना तांत्रिक मार्गदर्शन करणे, मेंढपाळांच्या शेळ्या-मेंढ्यांचे मान्सून पूर्व लसीकरण करणे, पशुधनाचे जंतनिर्मूलन, गोचीड निर्मूलन, करडे / कोकरे मरतूक कमी करणेबाबत उपाययोजना करणे, मेंढपाळांसाठी तांत्रिक मार्गदर्शन करण्यासाठी शिबिर / परिसंवादाचे आयोजन करणे, वृक्ष लागवड करणे इत्यादी उपक्रम राबविण्यात यावेत, अशा सूचना मंत्री श्रीमती मुंडे यांनी दिल्या आहेत. पशुसंवर्धन आयुक्त रामस्वामी एन आणि पशुसंवर्धन आयुक्त डॉ . प्रवीणकुमार देवरे यांच्या मार्गदर्शनाखाली ''पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर'' यांच्या ३०० व्या जयंती वर्षानिमित्त विभागाच्या मुख्यालयातही अभिवादनपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे. ''पशुसंवर्धन विभागाच्या या उपक्रमांमुळे मेंढी-शेळी पालकांशी थेट संवाद साधता येऊन शासनाचे विविध उपक्रम, योजना तसेच शेळी-मेंढी तांत्रिक व्यवस्थापनाविषयी माहिती पशुपालकांना देणे शक्य होईल. तसेच शेळी-मेंढीपालनाला आधुनिक व्यवसाय व्यवस्थापनाच्या माध्यमातून अधिक किफायतशीर करण्यासाठी विभागाला आवश्यक धोरणांची निर्मिती व अंमलबजावणी करणे सुलभ होईल'', असा विश्वास व्यक्त करत मा. मंत्री, पशुसंवर्धन ना. श्रीमती पंकजा मुंडे यांनी उपक्रमांच्या यशस्वीतेसाठी निर्देश दिले आहेत.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी यांचे कार्य आधुनिक भारतासाठी सदैव प्रेरणादायी-मा.आयएस धर्माधिकारी

**जालना । प्रतिनिधी**

**पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जन्मोत्सव वर्षानिमित्त त्यांच्या जीवन पटावर व्याख्यान देण्यासाठी मा.श्री. अविनाश धर्माधिकारी माजी आयएएस अधिकारी तथा संचालक चाणक्य मंडल, पुणे यांचे व्याख्यान अंबड येथे पंडित गोविंदराव जळगावकर नाट्यगृहात आयोजित करण्यात आले होते . मुला मुलीने आपलं उत्तम करियर कसे घडावे याबाबत त्यांनी मुला मुलींना मार्गदर्शन केले .**

थोर व्यक्तिमत्त्वांनी आपल्या कार्याने आणि विचारांनी समाजाला प्रेरणा दिली आहे. त्यापैकी एक म्हणजे पुण्यश्लोक लोकमाता अहिल्याबाई होळकर होत्या. अठराव्या शतकात पुरुषप्रधान समाजात स्वतःच्या बुद्धिमत्तेने, धैर्याने आणि प्रजाहितदक्षतेने माळवा प्रांतावर राज्य करणाऱ्या अहिल्याबाईंनी नारीशक्तीचा आदर्श घालून दिला. अहिल्याबाईंनी निष्पक्ष आणि प्रजाहितदक्ष प्रशासन प्रस्थापित केले. गावोगावी पंच नेमून त्वरित न्यायदानाची व्यवस्था केली. करप्रणाली सौम्य करून शेतकऱ्यांना दिलासा दिला. तसेच डोंगरी भागातील भिल्ल आणि गोंड आदिवासींना कर वसुलीचा अधिकार देऊन त्यांच्याशी मैत्रीपूर्ण संबंध प्रस्थापित केले. त्यांनी स्वतःच्या मुलाला रथाखाली वासराला चिरडल्याबद्दल शिक्षा ठोठावली, ज्यामुळे त्यांच्या न्यायनिष्ठेची ख्याती पसरली. पुण्यश्लोक लोकमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंतीनिमित्त या कार्यक्रमाला कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अंबड बदनापूर विधानसभेचे आमदार श्री नारायण भाऊ कुचे , जालना महानगरपालिका चे अतिरिक्त आयुक्त प्रियंका राजपूत, अंबड मुख्याधिकारी, जाफराबाद मुख्याधिकारी भोकरदन मुख्याधिकारी बदनापूर मुख्याधिकारी तसेच भाजपचे सर्व कार्यकर्ते यांच्यासह अंबड शहरातील सर्व पक्षाचे कार्यकर्ते यांच्यासह नागरिक व मुलं मुली मोठ्या संख्येने उपस्थिति होती.



पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकऱ्यांसाठी सौम्य करप्रणाली, आणि भिल्ल-गोंड आदिवासींशी मैत्रीपूर्ण संबंध यांचे स्मरण करण्यात आले. त्यांनी विहिरी, तलाव, घाट, रस्ते, धर्मशाळा आणि मंदिरांचे बांधकाम करून सामाजिक आणि पर्यावरणीय विकासाला चालना दिली. सती प्रथेला विरोध, महिलांसाठी व्यावसायिक प्रशिक्षण आणि सर्वधर्मसमभावाच्या विचारांनी त्यांनी सामाजिक समतेचा आदर्श घालून दिला. महेश्वर येथील विणकर आणि कारागिरांना प्रोत्साहन देऊन त्यांनी उद्योगाला चालना दिली, ज्याची साक्ष आजही माहेश्वरी साड्यांच्या रूपाने दिसते. असे यावेळी बोलतानी श्री धर्माधिकारी म्हणाले अहिल्यादेवींच्या कार्याला आधुनिक भारतासाठी प्रेरणादायी आहे तसेच पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे सुशासन, सामाजिक समता आणि पर्यावरण संवर्धनाचे विचार आजही आपल्याला दिशा दाखवतात. त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन आपण समाजात समानता आणि प्रगती साध्य करू शकतो. अहिल्याबाईंनी सर्वधर्मसमभावाचा आदर्श ठेवला. त्यांनी काशी, अयोध्या, द्वारका, नाशिक, पंढरपूर येथे मंदिरे बांधली आणि सोमनाथ, काशीविश्वेश्वर, महाकाळेश्वर मंदिरांचा जीर्णोद्धार केला. मशिदी, दर्गे आणि विहार यांचेही बांधकाम केले. मराठी कवी मोरोपंत, शाहीर अनंतफंदी आणि संस्कृत विद्वान खुशालीराम यांना आश्रय दिला. त्यांचा ग्रंथसंग्रह, ज्यात ज्ञानेश्वरी, रामायण आणि पद्मपुराण यांसारखी हस्तलिखिते होती, हा त्यांच्या विद्वत्तेचा पुरावा आहे. असेही यावेळी ते म्हणाले. अहिल्यादेवींच्या विचारांनी प्रेरित होऊन आपण आजच्या आव्हानांना सामोरे जाऊ शकतो. महिला सक्षमीकरणासाठी फायदा होऊ शकतो. अहिल्यादेवींच्या कार्यातून प्रेरणा घेऊन स्वावलंबन आणि सामाजिक बदलासाठी पुढे येण्यासाठी प्रत्येक महिलेने व मुला मुलींनी संकल्प करावा असे मत त्यांनी व्यक्त केले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या विचारांचा प्रसार आणि प्रचार करण्याचे आवाहन केले. हा व्याख्यान केवळ अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंतीचा उत्सव नसून, त्यांच्या विचारांना आणि कार्याला आधुनिक काळात जीवंत ठेवण्याचा एक यशस्वी प्रयत्न ठरला आहे. या कार्यक्रमाने महिलांना प्रेरणा देऊन सामाजिक आणि आर्थिक सक्षमीकरणाला चालना दिली आहे. अहिल्यादेवींच्या आदर्शांना अनुसरून समाजात सकारात्मक बदल घडवण्याचा संदेश या व्याख्याना मधून दिला. असल्याचे देखील यावेळी सांगण्यात आले. यावेळी या कार्यक्रमाच्या यशस्वीसाठी मुख्याधिकारी नगरपरिषद अंबड व सर्व नगरपालिका कर्मचारी यांनी प्रयत्न केले

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर

ममै वांशो जीवलोके जीवभूत: सनातन:।

भगवद्गीतेत सांगितल्याप्रमाणे साक्षात परमेश्वरानेच माणसाला त्याचा अंश मानलेले आहे. आमची भारतीय संस्कृती ही मग त्याची आहे. ती मानवाला म्हणजेच समाजाला निरंतर उन्नत, स्थिर राहण्याचे मार्गदर्शन करते. आपण ही आपल्याला ईश्वर शक्तीचा अंश मानून दृढ विश्वासाने या संस्कृतीच्या मार्गावर ठेवले पाहिजे. या संस्कृतीच्या महान मार्गाच्या काही विचारसूत्रांचे पुढे प्रतिकांमध्ये रूपांतर झाले. सहाजिकच ते समाजाच्या कृतीत उतरले आणि मग आपल्या जीवन पद्धतीचा अविभाज्य घटक बनलेले आहे. पूर्वजांना या संस्कृतीवर विश्वास होता. आजही या संस्कृतीतील कार्यकारणभाव ओळखून तसाच दृढ विश्वास ठेवला पाहिजे. भारताने शेकडो वर्षांपासून परकीय शासकांचे जबरदस्त प्रहार झेलूनही हजारो वर्षांची आपली भारतीय प्राचीन संस्कृती टिकवून ठेवली आहे, उभी आहे. अनेक प्रवाहांना सामील करून घेत प्रवाहीत आहे. अगदी आजच्या सामाजिक समस्यांची उकल सुद्धा या संस्कृतीच्या विचारधारेतून मिळू शकते. या विचारधारेच्या दृष्टीने कृतीयुक्त आदर्श परिपाठ म्हणून पहायचे असेल, एखादे व्यक्तिमत्व अभ्यासायचे असेल तर आपल्याला इ.स.१७२५ ते १७९५ या काळातील इतिहासाची काही पाने उघडावी लागतील. ही भारतीय विचारभक्ती जीवन म्हणून कशी जगता येते..? याचा उपयोग लोककल्याणासाठी कसा करावा..! याचे उत्तम उदाहरण म्हणजे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे जीवन चरित्र होय. 'ईश्वराने माझ्यावर जे उत्तरदायित्व सोपवले आहे ते पार पाडणे हे माझे कर्तव्य आहे. प्रजेला सुखी ठेवणे हे माझे काम आहे.' हे त्यांच्या राजनीतीचे सूत्र या विश्वासातूनच निर्माण झाले. त्यांच्या जीवनातील त्याग आणि सेवा ही ईश्वर समर्पित होती. ''जे काम करायचे आहे ते चांगले काम करावयाचे आहे तर त्याच्या मोबदल्यात मी काही घेत असेल तर ते चांगले काम कसे असू शकते..!'' म्हणजे भोग व भाव अवस्था संपून रूपांतरीत झालेली त्यांची ही देवभक्ती समर्पित देशभक्ती बनली होती. त्यांच्या प्रत्येक कार्यात ही देशभक्ती दिसून येते. अगदी त्यांच्या पत्राची सुरूवात 'श्री शंकर आज्ञेवरून' या मायन्याने होत असे. श्री महादेवाच्या आज्ञेवरून हे पत्र पाठवत असलेला असल्याचा भाव त्यांच्या हृदयात जागृत होता. आज जिथे छोट्या-छोट्या कामांसाठी स्वतःच्या नांवाचा आग्रह केला जातो. तिथं त्या पत्राच्या शेवटी सुद्धा अहिल्यादेवी स्वतःचे नांव अथवा सही करीत नव्हत्या. फक्त 'श्री शंकर' असे लिहीत होत्या. याचे कारण हिंदवी स्वराज्याचे अधिष्ठान हे मुळातच ईश्वरीय आहे असा त्यांचा विश्वास होता. अहिल्यादेवी राजघराण्यातील असल्या तरी त्यांचा पिंड हा धार्मिक व आध्यात्मिक होता. स्नानाने शरीरशुद्धी, ध्यानाने मनशुद्धी आणि दानाने धनशुद्धी होते असा त्यांचा विचार होता. अशा इतिहासाच्या शुद्ध पानांबद्दल आपण गौरव बाळगू, अस्मिता ठेवू. हा कर्तुत्वाचा सुगंध आजही सर्वत्र दरवळत आहे आणि पुढेही ठेवला पाहिजे. अहिल्यादेवींचा जन्म ३१ मे १७२५ रोजी अहिल्यानगर जिल्ह्यातील चौंडी या गावी झाला. वडील मानकोजीराव शिंदे आणि सुशीलाबाई यांनी त्यांना मातृशक्तीनुरूप संस्कारित केले. बालपणापासून अहिल्यादेवी भगवान शिवशंकराच्या भक्त होत्या. वयाच्या अवघ्या आठव्या वर्षी त्यांचा विवाह झाला. सुनेच्या रूपाने जणू होळकर घराण्यात कर्तबगारी आणि धर्मपरायणतेचे शुभ पाऊल पडले होते. हे शुभ पाऊल पुढे पडावे म्हणून विवाहानंतर उत्तम शिक्षण घेऊन खऱ्या अर्थाने नीतीशास्त्र, धर्मशास्त्र, अर्थशास्त्र, युद्धशास्त्र यामध्ये त्या पारंगत झाल्या होत्या. यासाठी त्यांचे सासरे मल्हारराव होळकर यांची प्रमुख भूमिका होती. मल्हारराव होळकर स्वतः एका सामान्य घोडेस्वारापासून हिंदवी स्वराज्याचे प्रमुख सरदार आणि मजबूत आधारस्तंभ बनलेले होते. कालांतराने त्यांचे पती खंडेराव कुंभेरीच्या लढाईत धारातीर्थी पडले. अहिल्यादेवींची खूप इच्छा असताना देखील मल्हाररावांनी त्यांना सती जाऊ दिले नाही. त्या काळात सामाजिकदृष्ट्या देखील वाईट प्रथांच्या विरोधातील या घराण्याचे हे एक पाऊल पुढे पडलेले होते. त्यांना राज्याच्या दायित्वाची जाणीव करून दिली आणि हळूहळू त्यांच्याकडे राज्यकारभार सोपवला. पुण्यश्लोक अहिल्यादेवी हिंदवी साम्राज्यातील माळवा प्रांताचा कारभार बघू लागल्या. या काळात मराठ्यांचा उत्तरेत प्रभाव वाढला. तेव्हा मंदिरांचा विध्वंस तर थांबलाच पण, अनेक मंदिरे पुन्हा बांधण्यात आली होती. या कार्यात या देवीचे मोठे योगदान आहे. नव्याने अनेक मंदिरं, घाटं बांधली. काशी विश्वनाथ, श्री सोमनाथ, परळी वैद्यनाथ, घृष्णेश्वर या ठिकाणच्या मंदिराचा जिर्णोद्धार केला. नवनिर्मितीचे हे कार्य त्यांनी त्यांच्या खाजगी खर्चातून केले आहे. सरकारी कोशातील एकही पैसा त्यांनी या कामासाठी वापरला नाही हे विशेष होय.. राज्यातील कर पद्धती देखील



अतिशय चोख होती. पिण्याच्या पाण्याचे महत्त्व ओळखून जलकुंड, विहिरी, बारव यांची निर्मिती केली. न्यायदानाबाबत तर त्या कर्तव्यकठोर म्हणून सर्व परिचित आहेत. कर्तव्याच्या बाबतीत नाते-गोते सुद्धा त्या पाहत नसत. अधिकाऱ्यांनी सुद्धा प्रजेवर जुलून करू नये, गैरकारभार करू नये याबाबतीत त्या अतिशय दक्ष होत्या. प्रजेला सुरक्षितता देणाऱ्या अहिल्यादेवी प्रजेला नैतिक, आध्यात्मिक, उन्नतीकडे नेण्यासाठी देखील प्रयत्न करत होत्या. कथा, कीर्तन, भजन, कला, साहित्य या सर्वांना प्रोत्साहन देत असत त्यामुळे महेश्वर ज्ञानसाधनेचे केंद्र बनले होते. आदर्श राज्यकर्ता उत्तम प्रशासक कुशल राजनीतिज्ञ, धर्मशील सौम्य स्वभावाच्या पण प्रसंगी तितक्याच कठोरपणे निर्णय घेणाऱ्या अहिल्यादेवी होत्या. समजुतीने आणि धोरणीपणाने राजकारण करणाऱ्या अहिल्यादेवी होत्या. रयतेला लुटणाऱ्या अट्टल गुन्हेगारांना कठोरपणे मृत्युदंडाची शिक्षा द्यायला मागेपुढे पाहत नसत. लढणारे सैन्य ही राज्याची मोठी शक्ती असते याची जाणीव असणाऱ्या अहिल्यादेवी.. आपण फक्त विचारांनी मनसूबे रचण्यासाठी बळकट असून भागत नाही. फौजफाट्यासह बळकट असावे असे आग्रहाने सांगणाऱ्या अहिल्यादेवी..! त्यांची राजकीय दृष्टी देखील तितकीच दूरगामी होते. हे लक्षात येते. आजच्या परिस्थितीत ही दृष्टी किती योग्य आहे हे देखील लक्षात येते. दानशूर, करूणा, परोपकार भावनेने ओतप्रोत असलेल्या अहिल्यादेवी यांनी अनेक अन्नछत्रं उघडली, पाणपोया सुरू केल्या. चराचर सृष्टीत ईश्वर पाहणारा भारतीय दृष्टिकोन अहिल्यादेवींच्या जीवनात प्रत्यक्षात साकार झाला होता. म्हणून पुण्यश्लोक अहिल्यादेवी धार्मिकता, लोककल्याणकारी आणि न्यायाचे प्रतीक आहेत. त्याचप्रमाणे त्या सामाजिक समरसतेचे देखील प्रतीक आहेत स्वतःच्या मुलीच्या विवाहाचा प्रसंग असेल, आदी व जाती जमातींना मुख्य प्रवाहात आणणे असेल यासारख्या अनेक निर्णयावरून ते सिद्ध होते. एक स्त्री म्हणून देखील वैयक्तिक सांसारिक जीवनाला सावरून, सांभाळून स्वतःला उभं केलं परंतु, हे स्वतःला उभं करणं केवळ स्वतःसाठी नव्हते. तर ते रयतेच्या, समाजाच्या सुखासाठी होते. स्त्री म्हणून तिच्यातील उपजत क्षमतांच्या आधारे अहिल्याबाई पुण्यश्लोक आणि देवी या पदाला पोहोचलेल्या आहेत. त्या अहिल्यादेवींना शतशः नमन..! ईश्वर प्रत्येक मनुष्याला वेगवेगळ्या प्रकारच्या शक्ती देतो. ज्या मानवी जीवन विकासासाठी उपयुक्त आहेत. भगवंताने ही शक्ती कशासाठी दिली आहे. याची त्या व्यक्तीला आठवण राहिली पाहिजे. आपण पाहतो आज सर्व ठिकाणी बुद्धिमान, वित्तमान, शक्तिमान, नितीमान लोकांना याची विस्मृती होईल अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. या गोष्टींची आठवण करून देण्यासाठीच तर तो ईश्वर विविध संत, महापुरूष, विभूती, मातृशक्तींना पाठवतो. परंतु, माणूस मात्र भोग आणि भाव निर्मितीपर्यंतच संपून त्या काम करणाऱ्यांना मात्र त्रास देतो. सर्वांना सुरूवातीला मूर्ख ठरवतो. पुढे भक्ती जरी निर्माण झाली तरी काही लोक केवळ मान देतात, त्याचे पूजन करतात पण त्याचे ऐकत नाहीत त्या सिद्ध झालेल्या वाटेवर म्हणूनच कदाचित चालू शकत नसतील का? म्हणून आपल्या अशा सर्व विस्मृती जागवण्यासाठी सर्व थोर विभूतींबद्दल भगवान सर्वांना स्मृती मान करो..! योग्य तो निर्णय घेण्याची क्षमता निर्माण करो..! यासाठी आपल्या सर्वांमध्ये भगवंताचा अंश आहे या त्याच्याशी असलेल्या आपल्या संबंधाची स्मृति राहो..! आणि मानवास दिलेल्या संस्कृतीच्या कृपाप्रसादाची जाणीव राहो..! या कृपाप्रसादाच्या जाणिवेतूनच प्रजेचे सुख हेच आपले सुख मानत अहिल्यादेवीने संपूर्ण आयुष्य प्रजेच्या कल्याणासाठी समर्पित केले. १३ ऑगस्ट १७९५ रोजी हा अध्यात्मिक अध्याय संपला. युगानुयुगे आपल्या स्मरणात राहील. जाज्वल्य इतिहासाच्या सुवर्ण पानांवर विराजमान झालेली ही मातृशक्ती आपल्याला सतत प्रेरणा देत राहील.

**श्रीमती वर्षा लक्ष्मणराव मुंडे-कराड**
(सहशिक्षिका, श्री खोलेश्वर प्राथमिक विद्यालय, अंबाजोगाई)

## पान १ वरून...

### शेतकऱ्यांच्या नुकसान

प्रतिसाद निधीमधून केवळ चक्रीवादळ, दुष्काळ, भूकंप, आग, पूर, त्सुनामी, गारपीट, दरड कोसळणे, बर्फखंड कोसळणे (हिमवर्षाव), ढगफुटी, टोळधाड, थंडीची लाट व कडाक्याची थंडी या १२ नैसर्गिक आपत्तीमध्ये बाधित होणाऱ्या नागरिकांना मदत अनुज्ञेय आहे.

--------

### महिला आयोगाने दखल

मात्र त्यावर कोणतीही दखल महिला आयोगाने घेतलेली नव्हती. याच पार्श्वभूमीवर पंकजा मुंडे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. या पत्रात मयूरी हिला हगवणे कुटुंबाकडून अत्याचार होत असून संरक्षण देण्याची मागणी करण्यात आली होती. 'तुला मुलगा होत नाही तर आमच्याकडे ये' या भाषेत मुलीला शिवीगाळ करण्यात आल्याचे मयूरीच्या आईने पत्रात सांगितले आहे. मात्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी यावेळी दखल का घेतली नाही? असा प्रश्न आता उपस्थित केला जात आहे. जर वेळीच हगवणे कुटूंबियाबाबत ॲक्शन घेतली गेली असती तर कदाचित वैष्णवीचा जीव वाचला असता, अशी हळहळ अनेकांकडून केली जात आहे. तोच धागा पकडून मंत्री पंकजा मुंडे यांनी आयोगाने योग्य भुमिका घ्यायला हवी होती,असे म्हटले आहे.

------------

### बीएसएफने पाकच्या

जो कोणी देशावर हल्ला करण्याचा प्रयत्न करेल त्याला चोख प्रत्युत्तर देण्यात येईल. पाकिस्तानने देशातील नागरिकांवर हल्ला केला, त्याचा प्रतिशोध घेण्यासाठी आपल्या लष्कराने त्यांचे नऊ हवाईतळ उद्ध्वस्त केले, आणि त्यामुळेच पाकिस्तानने शरणागती पत्करून युद्ध थांबवण्यासाठी गयावया केली, असा दावाही शहा यांनी यावेळी केला. शहा यांनी पाकिस्तानातील दहशतवादी तळांवर आणि पाक सैन्याच्या हवाईतळांवर भारतीय सैन्याने केलेल्या कारवाईची माहिती दिली. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यापासून पहिल्यांदाच पूँच जिल्ह्याला पाकिस्तानकडून एवढ्या मोठ्या प्रमाणात लक्ष्य करण्यात आले. मात्र भारतीय लष्करानेदेखील त्यांना चोख प्रत्त्युत्तर दिले, असे शहा म्हणाले. बीएसएफच्या कार्याचे कौतुक करताना शहा म्हणाले की, बीएसएफच्या जवानांनी पाकच्या ११८ चौक्या उद्ध्वस्त केल्याच, त्याचप्रमाणे त्यांची संदेशवहन यंत्रणाही पूर्णपणे उद्ध्वस्त करून टाकली ज्यामुळे पाकिस्तानला पूर्ण ताकदीने युद्ध लढणे शक्यच झाले नाही. शांततेच्या काळात बीएसएफच्या गुप्तचर विभागाने सावध राहून गोळा केलेल्या माहितीचा अचूक वापर पाकविरोधात कारवाई करताना केला. ही कामगिरी देशभक्ती आणि त्यागाचे प्रतीक आहे, असे शहा म्हणाले. ''अशी शौर्यगाथा तेव्हाच घडते जेव्हा देशाविषयी अभिमान, हृदयात देशभक्ती आणि सर्वोच्च त्यागाची तयारी असते, असे म्हणत शहा यांनी जवानांबद्दल सरकारच्या वतीने कृतज्ञता व्यक्त केली.

-------------

### राजकारणात जमीनदारी चालणार नाही;

इतर पक्षात जातात आणि नंतर पुन्हा त्यांच्या पक्षात परततात. अशा लोकांचे महत्त्व कमी होते. पक्षात सर्वात मोठे भांडवल म्हणजे संयम. जर तुम्ही संयम बाळगला तर तुम्हाला आदर मिळेल, अशा कानपिचक्या मोदींनी आपल्याच आमदार खासदारांना दिल्या. मोदींनी भाजपचा आतापर्यंतचा प्रवास आणि पूर्वजांचे बलिदान लक्षात ठेवण्याचा सल्ला दिला. विधानसभा निवडणुकीपूर्वी तिकीट वाटपाबाबत स्पष्ट रेषाही आखली. भाजप सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, मोदींनी या बैठकीत सांगितले की, भाजप चार पिढ्यांनंतर येथे पोहोचला आहे, तो जगातील सर्वात मोठा पक्ष बनला आहे. पूर्वजांचे बलिदान लक्षात ठेवा, त्यांच्यामुळेच आज आपण येथे पोहोचू शकलो आहोत. पंतप्रधान मोदी म्हणाले की, राजकारणात घराणेशाही चालणार नाही. जमीनदारी असू नये. जर तुम्ही नाही तर तुमचा मुलगा, असे घडू नये. एक कार्यकर्ता कठोर परिश्रम का करतो? त्याला त्याच्या कष्टाचे फळ का मिळू नये? असा सवाल करत तिकीट वाटपात कार्यकर्त्यांना प्राधान्य दिले जाईल, असे मोदींनी स्पष्ट केले. उमेदवारीसाठी इच्छुक असलेल्या नेत्यांना मोदींनी सांगितले की, सोशल मीडियावर ताकद असेल तरच तिकिटासाठी दावा करा. नेते आणि कार्यकर्ते सोशल मीडियावर सक्रिय असले पाहिजेत. उमेदवारी हवी असलेल्या कोणत्याही नेत्याचे सोशल मीडियावर किमान ५० हजारांपेक्षा जास्त फॉलोअर्स असले पाहिजेत. विजयाचा मंत्र देत पंतप्रधान मोदी म्हणाले की, बूथ मजबूत करा. बूथ मजबूत असेल तरच तुम्ही निवडणूक जिंकाल. बूथ जिंका, बिहार जिंका. प्रत्येक बूथवर लोकांना मन की बात सांगितली पाहिजे, असे मोदी म्हणाले.

---------

### बिंदुसरा धरणात अतिवृष्टीमुळे निर्माण झालेल्या

भागात जिल्हा प्रशासनाने वेळेवर माहिती द्यावी, ग्रामीण भागात मदत व बचाव कार्यासाठी यंत्रणा तत्पर ठेवावी अशी मागणी करण्यात आली आहे. सध्याची परिस्थिती पाहता भविष्यात मोठ्या दुर्घटनेची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे प्रशासनाने तातडीने कृती करावी. असेही शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी निवेदनामध्ये नमूद केले आहे.

-----------

### ...तर अमोल मिटकरी आणि अजित

बोललो, तर मिटकरी आणि अजित पवार यांच्या अंगावर कपडे राहणार नाहीत,'' असा इशारा त्यांनी दिला. हाके म्हणाले, ''फॉर्च्यूनर माझे साधन आहे, साध्य नाही. मिटकरी अजित पवारांच्या घरी झाडू मारतात, त्याबदल्यात त्यांना आमदारकी मिळाली.'' त्यांनी मिटकरींना ओबीसींसाठी बोलण्याचा आणि अजित पवारांनी वसतिगृहांसाठी निधी देण्याचा प्रश्न उपस्थित केला. हाके यांनी अजित पवारांवर 'काकांच्या जीवावर पुढे आले' असा टोला लगावत, आण्णासाहेब पाटील महामंडळाला हजारो कोटी मिळतात, पण ओबीसी महामंडळांना दोन-तीन कोटीही मिळत नसल्याचे त्यांनी म्हटले. हाके यांनी महाराष्ट्रात विरोधकच उरले नसल्याचा दावा करत, शरद पवार, सुप्रिया सुळे आणि रोहित पवार हे भाजपात सामील झाल्याचा आरोप केला. सामान्य माणसाचा आवाज दाबला जात आहे. आम्हाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून मोठ्या अपेक्षा आहेत, असेही त्यांनी नमूद केले.

--------

### वैष्णवी हगवणे प्रकरणातील फरार

मानसिक छळाला कंटाळून तिने हे टोकाचे पाऊल उचलल्याचा आरोप आहे. या प्रकरणात वैष्णवीचे पती शशांक, सासू लता, दीर सुशील, नंनद करिश्मा आणि सासरे, राष्ट्रवादी काँग्रेस नेते राजेंद्र हगवणे यांना यापूर्वीच अटक झाली आहे. वैष्णवीच्या मृत्यूनंतर तिचे १० महिन्यांचे बाळ निलेश चव्हाणच्या ताब्यात होते. वैष्णवीचे कुटुंबीय बाळाला घेण्यासाठी गेले असता, चव्हाणने त्यांना पिस्तुलाचा धाक दाखवून धमकावले. याप्रकरणी वारजे माळवाडी पोलीस ठाण्यात २२ मे रोजी गुन्हा दाखल झाला होता. तसेच, बावधन पोलीस ठाण्यात दाखल वैष्णवीच्या आत्महत्या प्रकरणात २४ मे रोजी चव्हाणला सहआरोपी करण्यात आले. त्याच्यावर बाळाची हेळसांड आणि धमकी दिल्याचे आरोप आहेत. चव्हाणला पकडण्यासाठी पोलिसांनी 'स्थायी वॉरंट' जारी केले होते. त्याच्या मालमत्तेची जप्तीची प्रक्रियाही सुरू आहे.

----------

### सरकारी लाडक्या बहिणींना

असताना देखील काही महिलांनी या योजनेचा लाभ घेतल्याचे दिसून आले आहे, या महिलांची नावं या योजेनेतून वगळण्यात येत आहेत. धक्कादायक म्हणजे चक्क सरकारी कर्मचारी असलेल्या महिलांनी देखील या योजनेचा लाभ घेतल्याची माहिती आता समोर आली आहे. याबाबत मंत्री आदिती तटकरे यांनी ट्विट करत माहिती दिली आहे.

-------------

cmyk

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

शनिवार दि. ३१ मे २०२५



## शासनाकडून जालना महापालिकेला अनुदान, ३९२ कोटी मंजूर

**जालना । प्रतिनिधी**

**जालना महानगरपालिकेस शासना मार्फत कायद्यात आवश्यक बदल करून पुढील ५ वर्षा करिता जीएसटी अनुदान ३९२ कोटी मंजूर झाल्यानंतर महापालिकेतील अधिकारी व कर्मचारी यांनी फटाके फोडून आनंद व्यक्त करण्यांत आला.**

याप्रसंगी मा.आयुक्त तथा प्रशासक श्री संतोष खांडेकर यांनी शासनाकडे पाठपुरावा केला आणि वरिष्ठ लिपीक श्री आंनद मोहीदे व श्री गणेश बत्तीन यांनी प्रस्ताव तयार करण्याकरिता परिश्रम घेतले आहे. त्याबद्दल त्यांच्या सत्कार करण्यात आला. याप्रसंगी मा.आयुक्त तथा प्रशासक श्री संतोष खांडेकर यांनी परभणी आणि लातूर महापालिका याचे पेक्षा जालना महापालिकेस अनुदान जास्त मंजूर झालेले आहे. जालना शहर हे स्टील हब, कृषी उत्पन्न बाजार समिती ही महाराष्ट्रातील एक मोठी बाजारपेठ आहे, शहरातील सीड उद्योग, कपडा मार्केट, लॉजिस्टिक्स पार्क, ड्राय पोर्ट तसेच विविध उद्योग व व्यापाराचे अनुषंगाने शहरातील प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष भरण्यात येणाऱ्या च्या अनुषंगाने सदरील अनुदान कमी मंजूर झालेले असून महापालिकेस जवळपास १२ ते १५ कोटी अनुदान मंजूर होणे अपेक्षित आहे. यावेळी मुख्यलेखाधिकारी तुकाराम भिसे, मुख्यलेखपरीक्षक प्रविण निंबाळकर, सहाय्यक आयुक्त सुप्रिया चव्हाण, शहर अभियंता सऊद, नगर अभियंता विद्युत कोमल गावंडे,कार्यालय अधीक्षक विजय फुलंब्रीकर, कर अधीक्षक राजेश कुरलीये आणि कार्यालयातील सर्व अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

# दत्तप्रसाद अजमेरा यांच्या बाजूने सहनिबंधकांनी दिलेला निकाल महानिबंधकांनी अखेर रद्द ठरवला


अंबाजोगाई । प्रतिनिधी

शहरातील गुरूवार पेठ भागातील दत्तप्रसाद हरिरामजी अजमेरा यांनी अंबाजोगाई पिपल्स को-ऑप बँकेकडून ५० लाख रूपयांचे कर्ज घेतले होते. ते थकल्यामुळे बँकेने वसुलीची कारवाई केली. दत्तप्रसाद अजमेरा यांनी त्यांचे घर विक्री करण्याचा ठराव नरसिंग व नारायण रांदड यांच्या सोबत केला. त्यानूसार रांदड यांनी अंबाजोगाई पिपल्स बँकेकडे गृहकर्जाची मागणी करून सर्व कर्ज प्रक्रिया पुर्ण केली. या कर्जास जामीनदार म्हणून स्वतः अजमेरा सुद्धा होते. या कर्जाच्या रक्कमेतून रांदड यांनी अजमेरा यांच्या कर्ज खात्यात रक्कम भरून गृह खरेदीची प्रक्रिया पुर्ण करून गृह कर्जाचे गहाणखत केले. रांदड यांनी सावकारांचे महानिबंधक, पुणे यांचेकडे सहनिबंधक, लातूर यांच्या निर्णयाच्या विरोधात धाव घेतली होती. याप्रकरणी सावकारांचे महानिबंधक तथा अपर आयुक्त व विशेष निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या निकालामुळे रांदड बंधू यांना मोठा दिलासा मिळाला आहे. तर या प्रकरणातील गैरअर्जदार दत्तप्रसाद अजमेरा यांच्यासाठी हा निकाल म्हणजे एकप्रकारे धक्का असल्याचेच सर्वत्र बोलल्या जात आहे.

या प्रकरणात दत्तप्रसाद अजमेरा यांनी रांदड व अंबाजोगाई पिपल्स को-ऑपरेटिव्ह बँकेविरूद्ध महाराष्ट्र सावकारी नियम अधिनियम २०१४ कलम नियमन आदी कलम १८ (२) प्रकरण जिल्हा सहनिबंधक सहकारी संस्था, बीड यांच्याकडे दाखल केले. सदरच्या प्रकरणात अजमेरा यांनी खरेदी खत व गहाण खत रद्द करण्याची मागणी केली होती. या प्रकरणात संपुर्ण न्यायिक प्रक्रिया, साक्ष जवाब नोंदविण्यात आले. या प्रकरणात आलेल्या सर्व बाबीं व बँकेच्या व्यवहारास सावकारी म्हणता येणार नाही. असा महत्त्वपूर्ण निर्णय देवून दत्तप्रसाद अजमेरा यांचे प्रकरण फेटाळले होते. या निकालाच्या नाराजीने अजमेरा यांनी विभागीय सहनिबंधक, लातूर यांच्याकडे अपील दाखल केले होते. या प्रकरणात सुनावणी घेवून मुख्यतः दत्तप्रसाद अजमेरा व रांदड यांच्यात झालेले खरेदीखत व बँकेकडे झालेले गहाणखत हे दोन्ही दस्ताऐवज एकाच दिवशी

### पूनरिक्षण अर्जामुळे नारायण व नरसिंग रांदड यांना मोठा दिलासा

झाले असल्यामुळे झालेला व्यवहार हा सावकारीत झाला असल्याची शंका व्यक्त झाल्यामुळे हे अपील मंजूर केले. या अपीलातील निर्णयामुळे न्याय मिळवून घेण्यासाठी रांदड यांनी मा.उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजीनगर खंडपीठात याचिका दाखल केली. या प्रकरणात दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेवून मा.न्यायमुर्ती किशोर संत यांनी विभागीय सहनिबंधक, लातूर यांचे आपील क्रमांक ०२/२३ प्रकरणामध्ये दिनांक ३१/०७/२०२४ च्या आदेशास ६ आठवड्यांची स्थगिती देऊन सदरचे प्रकरण हे सावकारांचे महानिबंधक, पुणे यांचेकडे दाखल करण्याचे आदेश दिले होते. या नुसार रांदड यांनी सावकारांचे महानिबंधक, पुणे यांचेकडे पूनरिक्षण अर्ज ४२/२०२४ दाखल केले. या प्रकरणात सावकारांचे महानिबंधक, पुणे यांनी पुनरिक्षण अर्जदार यांचा पुनरिक्षण अर्ज, दाखल केलेले लेखी स्वरूपातील म्हणणे, युक्तीवाद, गैरअर्जदार यांचे आव्हानीत आदेश, सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रे यांचे अवलोकन केले असता महानिबंधक हे १५ निष्कर्षांप्रत पोहोचले. यात मुख्यत्वे बँकेस सावकारी कायदा लागू नाही, केवळ मिळकतीचा ताबा असल्यामुळे सावकारी म्हणता येणार नाही, बँकेचे गृह कर्ज प्रकरण असल्यामुळे तसेच खरेदीखत व गहाणखत एकच दिवशी झाल्यामुळे सावकारी म्हणता येणार नाही, केवळ एकच व्यवहार असेल तर त्यास सावकारी व्यवहार म्हणता येणार नाही, त्यात सातत्य आणि उत्पन्न झाले पाहिजे, दिवाणी न्यायालय यांचे आदेश, साक्षी पुरावा व इतर सर्व बाबींनूसार या प्रकरणाचा अंतिम निकाल देत विभागीय सहनिबंधक, लातूर यांच्या दिनांक ३१/०७/२०२४ रोजीचे आदेश रद्द केले आहेत. आपल्या १९ मे २०२५ रोजी पारीत केलेल्या आदेशात त्यांनी नमूद केले आहे की, महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम, २०१४ चे कलम ९ आणि महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग चार-सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील अधिसुचना क्रमांक : एमएलए १०१४/प्र.क्र.२७७/७-स, दिनांक ०९ ऑक्टोंबर, २०१४ अन्वये मला प्रदान केलेल्या अधिकारानुसार आणि उपरोक्त नमुद निष्कर्ष व अनुमान विचारात घेता मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे. १) पुनरिक्षण अर्जदार यांचा महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम, २०१४ चे कलम ९ अन्वयेचा पुनरिक्षण अर्ज क्रमांक ४२/२०२४ मंजूर करण्यात येतो., २) गैरअर्जदार क्र.१ विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, लातूर यांचेकडील दिनांक ३१/०७/२०२४ रोजीचे आदेश रद्द करण्यात येत आहे., ३) गैरअर्जदार क्र.२ जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बीड यांचेकडील दिनांक २७/१२/२०२२ रोजीचे आदेश कायम करण्यात येत आहे., ४) महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ अंतर्गतचे तरतुदीनुसार संबंधित सक्षम अधिकारी यांनी या आदेशाची अंमलबजावणी होण्याचे दृष्टीने या प्रकरणातील दावा मिळकती बाबत महसुल दप्तरी योग्य व आवश्यक त्या नोंदी पुनरिक्षण अर्जदार श्री.नारायण पांडुरंग रांदड व इतर (१) यांचे हक्कात कायम कराव्यात., ५) खर्चाबाबत आदेश नाहीत. सदरचे आदेश आज दिनांक १९/०५/२०२५ रोजी माझे सही व कार्यालयीन मुद्रेसह पारीत केला असे. सावकाराचे महानिबंधक तथा अपर आयुक्त व विशेष निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र, राज्य, पुणे, यांनी जा.क्र.सआ३/साव./पु.अ.४२/२०२४/२३५ सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांचे कार्यालय. असे आदेश पारित केले आहेत. या दिशादर्शक आदेशामुळे रांदड कुटूंबियांना मोठा दिलासा मिळाला आहे. तर या प्रकरणातील गैरअर्जदार दत्तप्रसाद अजमेरा यांच्यासाठी तर हा निकाल म्हणजे एकप्रकारे धक्का असल्याचेच सर्वत्र बोलल्या जात आहे. या प्रकरणात रांदड यांच्या वतीने बीड व लातूर येथील प्रकरणात ॲड.व्ही.डी.शिंदे, ॲड.वांगजीकर, खंडपीठामध्ये ॲड.आनंद भंडारी, ॲड.ऋषिकेश तोतला यांनी व सह.महानिबंधक, पुणे येथे ॲड.धरणीधर पाटील यांनी काम पाहिले.



## जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयात स्पर्धा परीक्षा विभागात उत्तम प्रतिसाद

**बीड । प्रतिनिधी**

**जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय नगर रोड बीड येथे सकाळी आठ ते रात्री आठ बारा तास उघडी असलेली स्पर्धा परीक्षा विभाग समृद्ध करण्यात आला असून या ठिकाणी सुमारे १०० विद्यार्थी बसून अभ्यास करू शकतात अशी व्यवस्था जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयातर्फे करण्यात आली आहे.**

या ठिकाणी दररोज सुमारे २०० ते २५० विद्यार्थी अभ्यासासाठी येतात कोणी विद्यार्थी दोन तास बसतात कोणी चार तास कोणी आठ तास अशा पद्धतीने बसून दिवसभरामध्ये २०० ते २५० विद्यार्थी या अभ्यासिकेच्या लाभ घेतात आत्तापर्यंत या अभ्यासिकेत बरेचसे पोलीस कर्मचारी तलाठी ग्रामसेवक इतर इत्यादी पदावर विद्यार्थी या अभ्यासिकेतून उत्तीर्ण झाले आहेत तरी बीड जिल्ह्यामध्ये या अभ्यासिकेचे एक वेगळं स्थान असून जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी या स्पर्धा परीक्षा विभागाचा व येथील दर्जेदार ग्रंथ वृत्तपत्रे व मासिकाचा परिपूर्ण लाभ घ्यावा असे आव्हान जिल्हा ग्रंथालय अधिकारी संजय मस्के यांनी केले आहे .

## विभागीय आयुक्तांच्या हस्ते तहसिलदार विजय चव्हाण यांचा सत्कार



अंबड । प्रतिनिधी

सस्ती अदालत उपक्रमाचे आयोजन करुन अनेक शेतकऱ्यांचे रस्त्यांचे प्रश्न मार्गी लावल्याबद्दल

सरती अदालत या उपक्रमामध्ये जालना जिल्ह्यातील अंबड तहसिलदार विजय चव्हाण यांनी सर्वाधिक प्रकरणे दाखल असल्याले ती निकाली काढली आहेत. त्याबद्दल छत्रपती संभाजी नगर विभागीय आयुक्त श्री दिलीप गावडे यांच्या हस्ते शुक्रवारी रोजी (ता.३०) विभागीय आयुक्त कार्यालयात आयोजित कार्यक्रमात त्यांना अंबड चे तहसीलदार विजय चव्हाण यांना प्रशस्तीपत्र देवून सत्कार करण्यात आला.

सामान्य शेतकऱ्यांना अतिक्रमित शेत रस्ते, पाणंद रस्ते मोकळे करणेकामी जलद न्याय मिळावा व सदर प्रकरणात तातडीने निपटारा व्हावा यासाठी शासनाच्या सर्व संबंधित विभागाच्या अधिका-यांनी १५ दिवसातुन एकदा एका विकाणी शक्यतो तहसिल कार्यालयात किंवा गरजेनुसार मंडळ मुख्यालयाच्या ठिकाणी सरती अदालत या नावाने छत्रपती संभाजीनगर विभागात आठही जिलह्यात हा उपक्रम राबविण्या बाबत विभागीय आयुक्त यांनी सुचित केल्या होत्या. या उपक्रमांच्या माध्यमातुन तालुकास्तरावर सस्ती अदालत वा उपक्रमांचे आयोजन करून अनेक शेतकऱ्याच्या रस्त्यांचे प्रश्न मार्गी लावण्यात आले.

## शिवरस्ता अडवल्यामुळे शेतकऱ्यांनी केली तहसीलदाराकडे हेलिकॉप्टरची मागणी

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील मौजे खडकी देवळा येथील,रहिवाशी असलेले शेतकरी श्री.मल्हारी मुंडे,श्री.गोरख दराडे,श्री.दादाशिव चोले यांनी वडवणी तहसीलचे दंडाधिकारी यांच्याकडे २०१५ पासून वारंवार निवेदनाद्वारे मागणी करूनही खडकी व देवळा गावच्या मुख्य रस्त्यापासून उत्तरेला असलेला नकाशाप्रमाणे सरकारी शिव रस्ता खुला करून देण्यात आलेला नाही काही शेतकऱ्यांनी जाणून-बुजून बेकायदेशीररित्या हा रस्ता अडवला आहे तो खुला करावा यासाठी निवेदन अनेक वेळा करून उपोषणेही केलेली असताना प्रशासनाने फक्त मंडळ अधिकारी व तलाठी यांना पाठवून गोड बोलून रस्ता खुला करून देतो म्हणून अनेक वेळा पंचनामे करून पुढे कसलीही कारवाई केलेली नाही त्यामुळे २०१५ पासून बेकायदेशीर रित्या हा रस्ता बंद केलेला आहे तेव्हापासून शेतीच्या मशागती करणे कठीण होत आहे मागील दहा



वर्षापासून रस्ता बंद असल्याने जमीन पडीक पडण्याची वेळ आली आहे सध्या पावसाळा सुरू झाला असून अद्याप पर्यंत हा रस्ता खुला करण्यात आलेला नाही म्हणून.

वडवणी तहसीलचे तहसीलदार यांच्याकडे खडकी व देवळा या गावच्या मुख्य रस्त्यापासून उत्तरे कडील शिव रस्ता काही शेतकऱ्यांनी बेकायदेशीर रित्या अडवला आहे तो खुला करण्याचा आदेश देण्यात यावे अन्यथा जोपर्यंत रस्ता खुला करून देण्यात येत नाही तोपर्यंत शेतातील मशागतीस जाण्या येण्यासाठी हेलिकॉप्टरची निशुल्क सेवा उपलब्ध करून द्यावी अशी मागणी निवेदनाद्वारे खडकी देवळा येथील, रहिवाशी असलेले शेतकरी श्री.मल्हारी मुंडे,श्री.गोरख दराडे,श्री.दादाशिव चोले यांनी निवेदन देऊन,उपोषणे करून देखील दहा वर्षापासून न्यायमिळत नसल्यामुळे संतप्त होऊन केली आहे.

# पाटोदा मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने तालुक्यातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार ;विद्यार्थी व पालकांचा उस्फुर्त प्रतिसाद

**पाटोदा । प्रतिनिधी**

**पाटोदा तालुका मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने पाटोदा तालुक्यातील दहावी व बारावी परीक्षेत विशेष प्राविण्यासह यश संपादन करणाऱ्या तब्बल ५० विद्यार्थ्यांचा त्यांच्या पालकासह सत्कार करण्यात आला.**

पाटोदा रेणुका माता मंदिर येथील सभा मंडप येथे दिनांक ३० मे शुक्रवार रोजी सकाळी ११ वाजता कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले व कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी वसंतराव नाईक विद्यालयाचे प्राचार्य तुपे सर होते तर प्रमुख पाहूणे म्हणून उपविभागीय अधिकारी शेख वसिमा (मॅडम) नायब तहसीलदार सय्यद मुल्ला साहेब, पोलीस उपनिरीक्षक भडके प्राचार्य नजीर पठाण, जेष्ठ पत्रकार छगन मुळे, राहुल शाहुराव जाधव, सय्यद शहाबाज, जेष्ठ सेवा निवृत्त शिक्षक दे.मा.जावळे, प्राचार्य राजेंद्र आविळे आधी होते तालुक्यातील जवळपास १५ विद्यालयाचे एकूण प्रत्येकी तीन प्रमाणे जवळपास ५० विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते शाल श्रीफळ तसेच प्रशस्तिपत्र व स्मृतिचिन्ह देऊळ गौरविण्यात आहे विशेष म्हणजे यशस्वी विद्यार्थ्यांच्या




पालकांचाही यावेळी सत्कार करण्यात आला.

यावेळी यशस्वी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना उपग्रह उपयोगिता यांनी सांगितले की यशस्वी विद्यार्थी होण्यासाठी विद्यार्थ्यांनी मनाची तर चिकाटी पाणी पाहिजे जीवनातले आपले उद्देश ठेवा मात्र यामध्ये जर साध्य झाल्या जिद्द जाणिजे काठी तुम्हाला जरूर यशस्वी आपल्या इच्छित स्थळी पोचू शकते यावेळी त्यांनी या संदर्भात अनेक यशस्वी विद्यार्थ्यांची उदाहरणे दिले

यावेळी प्राचार्य तुकाराम तुपे यांचीही अध्यक्षस्थानी होते अध्यक्षीय बोलताना तुकाराम तुपे यांनी सांगितले की विद्यार्थ्यांवर पालकांनी सतत लक्ष ठेवने अत्यंत आज काळाची गरज असल्याचे सांगून विद्यार्थी सुद्धा आपल्या इच्छितोळे जाण्यासाठी मेहनत व चिकाटी आणि ठेवण्यास आपले उद्दिष्ट साध्य करू शकतो असे सांगितले यांनी आपल्या आपल्या मार्गदर्शनपर भाषण घेऊकार्यक्रमा यशस्वी करण्यासाठी पत्रकार संघाचे जेष्ठ पत्रकार छगन मुळे, तालुका अध्यक्ष अजय जोशी जिल्हा उपाध्यक्ष कादर मकरानी ,संजय सानप, हमीदखान पठाण,जावेद शेख, अनिल गायकवाड ,पवन भोकरे, सचिन शिंदे, सय्यद फय्याज, सतिश गर्जे,सय्यद साजिद, दत्ता देशमाने, दिगंबर नाईकनवरे, कार्यक्रमासाठीकार्यक्रमाची प्रस्ताविक प्रा सचिन पवार यांनी केले सूत्रसंचालन कादर मकरानी तर आभार हमीदखान पठाण यांनी मानले,

## ब्राह्मण सभेचा सामुदायिक उपनयन संस्कार सोहळा उत्साहात, १६ बटूचे झाले उपनयन

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**येथील ब्राह्मण सभेच्या वतीने सामुदायिक उपनयन संस्कार सोहळा गुरूवार २९ मे रोजी शहराच्या देशपांडे गल्लीतील धाकटे देवघर परिसरात मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या सोहळ्यात १६ बटुंचे उपनयन संस्कार करण्यात आले. सातत्याने गेल्या ४८ वर्षापासून उपनयन संस्कार सोहळ्याचा उपक्रम आर्थिक दुर्बल घटकांसाठी सातत्याने राबविला जात असल्याने या सोहळ्याचे सर्वत्र कौतुक होते.ब्राम्हण सभेचे अध्यक्ष अनिरुद्ध चौसाळकर यांच्या पुढाकारातून हा उपक्रम सातत्याने सुरू आहे.**

या सोहळ्यासाठी भाजपाचे युवा नेते अक्षय मुंदडा,माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी, माजी



आ.पृथ्वीराज साठे, कमलाकर चौसाळकर, गिरधारीलाल भराडिया, बबन लोमटे, मनोज लखेरा,प्रसाद चिक्षे, ॲड.मकरंद पत्की, महेश लोमटे,दिनकर जोशी,डॉ.अतूल देशपांडे, प्रशांत बर्दापुरकर,राहुल देशपांडे,दिलिप सांगळे,प्रभाकर सेलमोकर, पद्माकर सेलमोकर,संजय लोणीकर,मुकूंद घाटे, शिरीष पांडे,आनंद गोस्वामी,सुधाकर विडेकर, शैलेश गोस्वामी, ॲड.पद्मनाभ देशपांडे,ॲड.कल्याणी विर्धे, अनुपमा गोस्वामी, आरती सोनेसांगवीकर आदीसह शहरातील महिला, नागरिक विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते कार्यक्रमाचे संचलन प्रा.डॉ.गणेश पिंगळे यांनी केले कार्यक्रमासाठी ब्राम्हण सभेचे अध्यक्ष अनिरुद्ध चौसाळकर व इतर पदाधिकारी, संचालक तसेच पुरोहित संघाचे पदाधिकारी यांनी परीश्रम घेतले.

## खूनाच्या आरोपातून साळिंबा येथील भास्कर बिटे व रुक्मीन बिटे यांची निर्दोष मुक्तता

माजलगाव । प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील सांळीबा येथे दि ०२ डिसेंबर २०१९ रोजी ऋतुजा भास्कर बिटे हिच्या आई-वडिलांना विनाकारण शिवीगाळ करून पती भास्कर व सासू रुक्मिण बिटे या दोघांनी लाथा- बुक्याने,चापटाने मारहाण करून सासू रुक्मिणीच्या सांगण्यावरून पती भास्कर याने ऋतुजा हीच्या अंगावर घरातील रॉकेल ओतून काडी पेटवून तिच्या अंगावर टाकली. त्यामुळे ती पूर्णपणे जळाली होती. त्यामुळे तिला उपचार कामी सरकारी दवाखाना बीड शरीक करण्यात आले होते.मयताने उपचारादरम्यान मृत्यूपूर्व जवाबवरून वडवणी पोलीस स्टेशन येथे गु.र.नं १९६/२०१९ कलम ३०७,३४ भा.द.वी अन्वये गुन्हा दाखल झाला.त्यानंतर ऋतुजा हीस सरकारी दवाखाना बीड येथील जळीत वार्ड येथे उपचार सुरू असताना दिनांक ०३ डिसेंबर २०१९ रोजी ऋतुजा मरण पावली.त्यामुळे सदर गुन्ह्यात कलम ३०२,४९८(अ),५०६ कलम वाढ करण्यात आली.

सदर प्रकरणाचा तपास तपासी अंमलदार सहाय्यक पोलीस निरीक्षक एम.बी.टाक यांनी केला व आरोपी विरुद्ध दोषारोपपत्र प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी वडवणी यांच्या कोर्टात दाखल केले.सदर प्रकरण अतिरिक्त सत्र न्यायालयात चालणारे असल्यामुळे सदर प्रकरण अतिरिक्त सत्र न्यायालय माजलगाव येथे वर्ग करण्यात आले.सदर प्रकरणाचा सत्र न्यायालयातील खटला नंबर ३१/२०२० असा असून सदर प्रकरणात सरकार पक्षाच्या वतीने एकूण ११ साक्षीदार तपासण्यात आले त्यानंतर सरकार पक्षाच्या वतीने व आरोपीच्या वतीने बी.जी.धर्माधिकारी,अतिरिक्त सत्र न्यायाधीश माजलगाव यांच्या न्यायालयात



अंतिम युक्तिवाद केल्यानंतर कोर्टाने आरोपी भास्कर प्रल्हाद बिटे व रुक्मिण प्रल्हाद बिटे यांची सबळ पुराव्या अभावी व मयत ऋतुजा हिने दिलेल्या मृत्यूपूर्व जवाबामध्ये विसगंती असल्यामुळे निर्दोष मुक्तता केली.सदर प्रकरणात आरोपीच्या वतीने माजलगाव येथील ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. व्ही.बी.लवटे यांनी आरोपीच्या वतीने प्रभावीपणे बाजू मांडली व त्यांना ॲड.एल.बी.गवते, ॲड.एस.डी.लंगे, ॲड.व्ही.एन.जुजगर यांनी सहकार्य केले.

## पान ६ वरून...

### बीड शहरातील मुख्य

रस्ता रुंदीकरण, विद्युत खांबांना अडथळा होऊ नये म्हणून ते तोडण्याची वेळ येणार नाही, या बाबी स्पष्ट होतील. या बैठकीस आयएमएचे जिल्हाध्यक्ष डॉ.अनंत मुळे, सचिव डॉ.अमोल गीते, रोटरी क्लब ऑफ मीडटाऊनचे सदस्य संतोष पडोळे, लक्ष्मण मळेकर यांच्यासह नर्सरी चालक, वृक्षप्रेमी नागरिकांची उपस्थिती होती.

### लढलो नाही तर पिढी

यासाठी १४० गावातील शेतकऱ्यांनी एकत्र येत लोकलढा आंदोलन सुरू केले आहे. आंदोलनाच्या या दुसर्या टप्प्यात तांदळा येथे अजय पाटील साळुंके यांनी २५ मे पासून उपोषण सुरू केले आहे. गेल्या सहा दिवसात त्यांनी अन्नपाणी त्याग केल्याने त्यांची प्रकृती खालावली आहे. अशक्तपणा येऊन किडनीलाही त्रास होत आहे. त्यांच्या या प्रकृतीची माहिती मिळताच शुक्रवारी बाळराजे पवार यांनी तांदळा येथे भेट देऊन अजय पाटील साळुंके यांच्या तब्येतीची विचारपूस केली. यावेळी बोलताना बाळराजे पवार म्हणाले, की आपल्या भागातील शेती जायकवाडीच्या पाण्यापासून वंचित आहे, त्यामुळे शेतकरी अडचणीत असून त्यांच्यासमोर अनेक प्रश्न आहेत. हे प्रश्न सोडवण्यासाठी आपल्याला नदीजोड प्रकल्प होणे आवश्यक आहे, या योजना होण्यासाठी हा लोकलढा महत्वाचा असल्याचेही ते म्हणाले. आपण लढलो नाहीत, त्यामुळे आतापर्यंत धरणाचे पाणी आपल्याला मिळाले नाही, यामुळे पिढ्यांचा विकास खुंटला आता आपण एकत्र येत लढणे गरजेचे आहे, आपण लढलो नाही तर पिढ्या वाया जातील, त्यामुळे एकत्र येत लोकलढा तीव्र करू, आपण कायम शेतकर्यांसोबत असल्याचा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

### प्रशासनातील पारदर्शकतेसाठी

लागत नाही असा गंभीर आरोप आरोप वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष अजय सरवदे यांनी प्रसिद्धीपत्रकारद्वारे केले आहे. आज जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये बदलीस पात्र अधिकारीकर्मचारी यांची बैठक आयोजित केली आहे. यामधे खूप मोठा आर्थिक व्यवहार करत तालुका वाटप केले जातील यासाठी बैठक आयोजित केल्याचा आरोप सरवदे यांनी केला आहे.

### अधिक काळ पाटोद्यात

तीन वर्षांपेक्षा अधिक काळ कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांचे बदल्या करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्यानुसार, पाच वर्षांपेक्षा अधिक कालावधीसाठी एकाच ठिकाणी कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांच्या बदल्या होणे अपेक्षित आहे. या पार्श्वभूमीवर, पाटोदा तालुक्यातील अनेक ग्रामपंचायती, स्थानिक लोकप्रतिनिधी व सामान्य नागरिक प्रशासनाकडे सतत मागणी करत आहेत की, दीर्घकाळ कार्यरत कर्मचाऱ्यांच्या बदल्यांमुळे नवीन कर्मचाऱ्यांचे आगमन होऊन कार्यात पारदर्शकता व गती येईल.जिल्हाधिकारी आणि जिल्हा परिषद सीईओ हे बदल्यां विषयी कोणता निर्णय घेतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले असून, नागरिकांना लवकरच सकारात्मक हालचाली अपेक्षित आहेत.

cmyk

# केंद्र सरकारने हमीभावात शेतकऱ्यांची फसवणूक केली

## काँग्रेस, सीपीआयची गंभीर टिका

दिल्ली : केंद्र सरकारने किमान आधारभूत किंमत म्हणजे हमीभावाच्या नावाखाली शेतकऱ्यांची फसवणूक केल्याचा आरोप काँग्रेसने केला. केंद्र सरकारने २०२५ च्या खरीप हंगामासाठी १४ पिकांचे हमीभाव जाहीर केले. यामध्ये उत्पादन खर्चाच्या ५० टक्के वाढ केल्याचा दावा केला. परंतु जाहीर केलेली हमीभाव स्वामीनाथन आयोगाच्या उत्पादन खर्च (सी२)+५० टक्के सूत्राच्या तुलनेत कमी असल्याचे काँग्रेसने टिका केली आहे. काँग्रेससोबत सीपीआयनेही सरकारवर गंभीर टिका केली आहे.

काँग्रेसचे सरचिटणीस रणदीप सुरजेवाला यांनी हमीभावावरून केंद्र सरकारवर निशाणा साधला. ‘‘केंद्र सरकार पिकांसाठी हमीभाव जाहीर करून स्वतःचा गौरव करत आहे. परंतु वस्तुस्थिती अशी आहे की हमीभाव हे स्वामिनाथन आयोगाने सुचवलेल्या सी२+५०% सूत्राच्या तुलनेत खूपच कमी आहे. सरकार गहू आणि तांदूळ वगळता इतर पिकांची खरेदी करतच नाही, आणि हमीभावाच्या नावाखाली शेतकऱ्यांची फसवणूक होत आहे.‘‘ असेही सुरजेवाला म्हणाले. सुरजेवाला यांनी केंद्र सरकारची हमीभाव खरेदीची आकडेवारी



माध्यमासमोर वाचून दाखवली. २०२३-२४ मध्ये सरकारने हमीभावाने अतिशय कमी पिकांची खरेदी केली आहे. हरभऱ्याच्या एकूण उत्पादनापैकी फक्त ०.३७ टक्के, मका ०.०१ टक्के आणि बाजरी केवळ ६.४९ टक्के खरेदी सरकारने केल्याचं सुरजेवाला म्हणाले. संसदेच्या कृषी स्थायी समितीने सरकारला हमीभाव हमी कायदा करण्याची शिफारस केली आहे. तसेच शेतीवरील कर काढून टाकण्याचीही सूचना केली आहे, पण पंतप्रधानांनी हा अहवाल कचरापेटीत फेकून दिला, असा आरोप सुरजेवाला यांनी केला. अखिल भारतीय किसान सभेचे अशोक ढवळे यांनीही निवेदन प्रसिद्ध करून केंद्र सरकारवर टिका केली आहे. ‘‘खरीप हंगाम २०२५-२६ साठी केंद्र सरकारने जाहीर केलेली हमीभाव ही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची आणखी एक फसवणूक आहे.‘‘ पुढे ते म्हणाले, भाजप सरकारने दावा केला की त्यांनी २०२५-२६ च्या खरीप हंगामासाठी २.०७ लाख कोटींचे हमीभाव पॅकेज जाहीर करून शेतकऱ्यांना मोठा आधार दिला आहे. परंतु वस्तुस्थितीपासून हा दावा फार लांब आहे. सरकारने आकड्यांची कसरत करून जनतेची दिशाभूल केल्याचे ढवळे म्हणाले. एम.एस. स्वामिनाथन यांनी सी २ खर्चाच्या किमान ५० टक्के अधिक दर मिळायला हवा अशी शिफारस केली होती. परंतु हमीभाव जाहीर होत असले तरी सरकार खरेदी करत नाही, त्यामुळे ती फक्त कागदावरच उरत असल्याचे ढवळे म्हणाले.

### शिफारशीपेक्षा कमी हमीभाव

भाजपशासित राज्यांनी केलेल्या शिफारशीपेक्षा हमीभाव कमी आहे. ज्या राज्यांनी स्वतःच्या उत्पादन खर्चावर आधारित अधिक दर सुचवले होते. त्यापेक्षा हमीभाव कमी आहेत, कृषी किंमत आणि मूल्य आयोगाच्या अहवालाचा दाखल देत ढवळे यांनी दावा केला आहे.

# बीबीएफ तंत्रज्ञान : कोरडवाहू शेतकऱ्यांसाठी वरदान



गेल्या काही वर्षांमध्ये वातावरण बदलाचे फटके शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात बसत आहेत. कधी पाऊस अधिक पडतो, तर कधी तो रुसून बसतो. पाऊस कमी पडल्यामुळे पाण्याच्या कमतरतेचा ताण, तर अतिपावसाच्या स्थितीमध्ये शेतामध्ये पाणी साचण्यामुळे होणारा ताण पिकांवर विपरीत परिणाम करतो. पीक कोणतेही असो, त्याच्या तग धरण्यासाठी कमी पावसाच्या स्थितीमध्ये जमिनीतील ओलावा टिकवण्याची आवश्यकता असते.

तर अतिपावसाच्या स्थितीमध्ये पाण्याचे योग्य पद्धतीने निचरा करण्याची किंवा पाण्याच्या उत्तम व्यवस्थापनाची गरज असते. बहुतांश शेतकरी याबाबत तितके जागरूक नसल्याने किंवा त्यासाठीचे तंत्रज्ञान अपुरे असल्यामुळे पिकांचे मोठे नुकसान होते. अशा स्थितीमध्ये कोरडवाहू शेतकऱ्यांसाठी रुंद वरंबा सरी (बीबीएफ) हे तंत्रज्ञान वरदान ठरू शकते.बीबीएफ आधारित सुधारित तंत्रज्ञान :मध्यम काळ्या जमिनीची निवड करावी. एक नांगरट करून दोन कुळवाच्या पाळ्या देऊन जमीन भुसभुशीत करावी. रायझोबियम, ट्रायकोडर्मा आणि स्फुरद विरघळविणारे जिवाणू यांचे मिश्रण असलेले जैविक द्रावणाची (पीडीकेव्ही बायोकॉन्सर्सिया) यांची सोयाबीन बियाण्यांवर प्रक्रिया करावी.बीबीएफ यंत्राच्या साह्याने मूग, उडीद, ज्वारी, मका, भुईमूग, कपाशी अशा तासामधील अंतर ४५ सेंमी असलेल्या सर्व पिकांची पेरणी करणे शक्य आहे.बीबीएफ तंत्राचे फायदे :जास्त पाऊस असल्यास सरींमधून अतिरिक्त पाणी वाहून जाते, त्यामुळे जमिनीतील पाण्याचा निचरा व्यवस्थित होतो. कमी पाऊस असल्यास जल संधारणामुळे मुळांजवळ आवश्यक तितका ओलावा साठवला जातो. त्यामुळे पीक दुष्काळ स्थिती, पावसाचा दीर्घ कालीन खंडामध्येही तग धरते. गेल्या काही वर्षातील प्रात्यक्षिकांमध्ये बीबीएफ तंत्रज्ञांनाचा वापर करणाऱ्या शेतकऱ्यांचे उत्पादन एकरी ३ ते ४ क्विंटल ने वाढल्याचे दिसून आले आहे.

# शेवाळाच्या शेतीतून मिळते बक्कळ कमाई

शेतकरी मित्रांनो शेतीमध्ये नवनवे तंत्रज्ञान विकसीत झाले आहे त्यामुळे केवळ जमिनीतून होणारी लागवड नव्हे तर इतर पद्धतीने देखील लागवड करता येते. स्पिरुलिना लागवड म्हणजेच शेवाळाच्या शेती केल्यास यातून बक्कळ पैसे मिळू शकतात. स्पिरुलिना हे औषधी गुणधर्मांनी समृद्ध आहे त्याची लागवड मोठ्या प्रमाणात केली जाते कारण त्यातून प्रचंड उत्पन्न मिळते. आरोग्यदायी फूड सप्लिमेंट म्हणौन त्याचा आहारात वापर केला जातो. ते खूप महागड्या किमतीने विकले जाते.

स्पिरुलिना लागवड पद्धत :स्पिरुलिनाच्या लागवडीसाठी, आपण ज्या क्षेत्रात लागवड करत आहोत त्या क्षेत्राचे तापमान १५ अंश सेल्सिअस ते ४५ अंश सेल्सिअस असावे. परंतु ते १५ डिग्री सेल्सियसपेक्षा कमी नसावे. यासोबतच पाण्याचा पीएच ९ पेक्षा जास्त असावा. पण समुद्राच्या क्षेत्रापासून दूर असलेल्या भागात सोडियम क्लोराईड, बेकिंग सोडा आणि मीठ टाकून पाण्याचा पीएच वाढवता येतो. यासाठी टाकी बनवू शकता किंवा स्वस्तात काम करायचे असल्यास, तुम्हाला खड्डा खोदून त्यात प्लास्टिक टाकावे लागेल.

त्यात आधी पाणी टाकावे लागते. पाण्यात प्रति हजार लिटर मागे एक किलो मदर कल्चर म्हणजेच शेवाळ स्लरी सोडल्या जातात. त्यानंतर




ठराविक वेळा पर्यंत पाणी ढवळून ठेवले जाते. सुमारे ३० ते ४५ दिवसांपर्यंत स्पिरुलिनाची वाढ काढणी योग्य होते. त्यानंतर ५०० मायक्रोनच्या जाळीतून पाणी पूर्णपणे काढून टाकले जाते.

तयार स्पिरुलिनाचे नूडल्स किंवा पापड करून तापमानामध्ये सुकवली जातात. पावडर तयार करून पुढे यंत्राद्वारे टेबलेट्स तयार केल्या जातात.स्पिरुलिनाची गोळी बनवायची पद्धत :स्पिरुलिना बंद खोलीत ठेवा, जिथे हवा नसेल. ते कोरडे होईपर्यंत त्या खोलीत ठेवा. यानंतर हाताने लाटून पेनासारखा पातळ करा. त्यानंतर त्याचे तुकडे करून घ्या. आपण त्याचे ५०० मिलीग्राम टॅब्लेट बनवू शकता.एक एकरात इतकी कमाई होईल :स्पिरुलिनाचे उत्पादन दररोज सरासरी आठ ग्रॅम प्रति चौरस मीटर आहे. या अर्थाने एका एकरात दररोज ३२ किलो उत्पादन होईल. त्याची सरासरी ८०० रुपये प्रतिकिलो दराने विक्री होते. त्यानुसार एका दिवसात २५,९०० रुपये येतात. एका महिन्यात ते सात लाख रुपयांपेक्षा जास्त पैसे देते. त्याचे प्रशिक्षण भारत सरकारच्या एमएसएमई मंत्रालयाच्या अंतर्गत दिले जाते.


# खरिपातील मूग, उडीद लागवडीचे तंत्र

खरीप हंगामामध्ये मूग आणि उडीद ही महत्त्वाची कडधान्य पिके आहेत. त्यांची मुख्य किंवा आंतरपीक म्हणूनही लागवड करण्यात येते. ही दोन्ही पिके कमी कालावधीची (दोन ते अडीच महिने) आहेत. बाजारातील मागणी व दरही चांगला असल्याने कमी काळात बऱ्यापैकी आर्थिक फायदा देणारी पिके म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते.

जमिनीची निवड, पूर्वमशागत :या दोन्ही पिकांना मध्यम ते भारी, पाण्याचा उत्तम निचरा होणारी जमीन निवडावी. क्षारयुक्त, पाणथळ तसेच उतारावरील हलक्या जमिनीवर या पिकांची लागवड करू नये. या पिकांना जास्त मशागतीची आवश्यकता लागत नाही. पूर्वीच्या पिकाची काढणी झाल्यानंतर खोल नांगरट करावी. त्यानंतर मृगाचा पहिला मोठा पाऊस पडून गेल्यावर वखरपाळी देऊन, धसकटे, काडीकचरा वेचून घ्यावा. कुळवाच्या एक दोन पाळ्या देऊन जमीन भुसभुशीत करून घ्यावी. शेवटच्या पाळी अगोदर हेक्टरी १५ ते २० गाड्या शेणखत जमिनीत मिसळावे.

पेरणीची वेळ :वेळेवर पेरणीस अतिशय महत्त्व आहे. मान्सूनचा पहिला पेरणीयोग्य पाऊस पडल्यावर व जमीन वाफसा आल्याबरोबर लवकरात लवकर मूग, उडिदाची पेरणी करावी. शक्यतो जूनच्या दुसऱ्या पंधरवड्यात पेरणी पूर्ण करावी. पेरणीस उशीर झाल्यास पिकास त्याच्या कायिक वाढीस पुरेसा अवधी मिळत नाही.

परिणामी, पिकाची वाढ कमी होऊन फुले, शेंगा कमी लागतात. उत्पादनामध्ये मोठी घट येते. पेरणीस जसा उशीर होईल त्याप्रमाणात उत्पादनातही



घट होत जाते. ७ जुलैनंतर या पिकांची पेरणी टाळावी.

बियाणे प्रमाण, पेरणीचे अंतर :अपेक्षित उत्पादन मिळण्याच्यादृष्टीने हेक्टरी रोपांची संख्या योग्य प्रमाणात असणे आवश्यक असते. प्रति हेक्टरी रोपांची संख्या राखण्याकरिता १२ ते १५ किलो बियाणे वापरावे. दोन ओळींतील ३० सेंमी. आणि दोन रोपांमध्ये १० सेंमी अंतर ठेवून पेरणी करावी.

बीजप्रक्रिया :बियाण्याची उगवण चांगली होण्यासाठी आणि रोपाच्या अवस्थेत बुरशीजन्य रोगांपासून संरक्षण करण्यासाठी पेरणीपूर्वी प्रति किलो बियाण्यास ट्रायकोडर्मा ५ ग्रॅम किंवा कार्बेन्डाझिम २ ग्रॅम अधिक थायरम २ ग्रॅम एकत्र करून प्रक्रिया करावी. यानंतर रायझोबिअम व स्फुरद विरघळवणारे जिवाणू संवर्धक २५० ग्रॅम किंवा एकत्रित द्रवरूप जिवाणू संवर्धक १०० मि.लि. प्रति १० किलो बियाणे या प्रमाणे प्रक्रिया करावी. बियाणे सावलीत सुकवून लगेच पेरणी करावी. यामुळे मुळांवरील गाठीचे प्रमाण वाढते. पिकास हवेतील नत्र उपलब्ध होतो.

खत व्यवस्थापन :

या पिकांच्या मुळाद्वारे नत्र स्थिरीकरण चांगले व्हावे आणि मुळाची वाढ योग्य होण्याकरिता सेंद्रिय खतांचा वापर करावा. जमिनीची मशागतीवेळी शेवटच्या वखरणीआधी चांगले कुजलेले शेणखत किंवा कंपोस्ट खत ५ टन प्रती हेक्टरी द्यावे. पेरणीच्या वेळी २५ किलो नत्र आणि ५० किलो स्फुरद हेक्टरी मात्रा द्यावी. यासाठी एकरी २५ किलो युरिया आणि १२५ किलो सिंगल सुपर फॉस्फेट वापरावे किंवा डायअमोनिअम फॉस्फेट (डीएपी) ५० किलो प्रती एकरी द्यावे.

आंतरमशागत :उभ्या पिकामध्ये वेळीच आंतरमशागत करणे गरजेचे आहे. पीक पेरणीपासून पहिले ३० ते ४५ दिवस तणविरहित ठेवावे. त्यासाठी पेरणीनंतर २० ते २५ दिवसांनी एक आणि ३० ते ३५ दिवसांनी दुसरी कोळपणी करावी. कोळपणी केल्याने जमीन भुसभुशीत होऊन हवा खेळती राहते. ओलावा टिकण्यास मदत होते. गरजेनुसार एक किंवा दोन खुरपण्या कराव्यात.

पाणी व्यवस्थापन :ही पिके प्रामुख्याने पावसाच्या पाण्यावर येणारी आहेत. मात्र फुले येताना आणि शेंगा भरताना ओलाव्याची कमतरता भासू लागते. या स्थितीमध्ये जमिनीत ओलावा कमी झाल्यास हलके पाणी द्यावे. अगदीच पाण्याची कमतरता असले तरी २ टक्के युरियाची (२० ग्रॅम प्रति लिटर पाणी) फवारणी करावी.

उत्पादकता कमी असल्याची कारणे :खरीप हंगामात अनियमित पडणारा पाऊस. अयोग्य जमिनीची निवड. जैविक बीजप्रक्रियेचा अवलंब न करणे. सुधारित बियाण्यांचा अभाव. खतमात्रा अपुऱ्या देणे किंवा टाळणे. हेक्टरी झाडांची योग्य संख्या न राखणे.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१२२३ : कालका नदीची लढाई : चंगीझ खान व पूर्व स्लाव्हिक सैन्यांमध्ये चकमक. मोंगोल सैन्याचा विजय.
१७२७ : फ्रान्स, ब्रिटन आणि नेदरलँड्स या देशांनी पॅरिस करारावर स्वाक्षरी केल्या.
१७५९ : अमेरिकेच्या पेनसिल्व्हेनिया प्रांतात नाटकांवर बंदी.
१७७४ : ब्रिटीश कालीन भारतात पहिल्या पोस्ट सेवा कार्यलयाची स्थापना करण्यात आली.
१७९० : अमेरिकेत १७९०चा कॉपीराईट कायदा लागू.
१८६७ : मुंबई इथे प्रार्थना समाजाची स्थापना करण्यात आली.
१९१० : दक्षिण आफ्रिकेला स्वातंत्र्य.
१९१३ : अमेरिकेच्या संविधानातील १३वा बदल संमत.
१९२१ : अमेरिकेतील तल्सा शहरात वांशिक दंगे. ३९हून अधिक ठार.
१९२१ : आधुनिक गुजराथीतील प्रसिद्ध कवी सुरेश हरिप्रसाद जोशी यांचा जन्म.
१९२४ : सोवियेत संघाने बाह्य मोंगोलियावरील चीनचे आधिपत्य मान्य केले.
१९२७ : फोर्ड मोटर कंपनीची मॉडेल टी प्रकारची शेवटची कार तयार झाली. या प्रकारच्या एकूण १,५०,०७,००३ कार तयार केल्या गेल्या.
१९३५ : पाकिस्तानच्या बलुचिस्तान प्रांतातील क्वेट्टा येथे झालेल्या ७.७ रिच्टर तीव्रतेच्या भूकंपात ५६,००० लोक ठार झाले.
१९४२ : दुसरे महायुद्ध : जपानच्या पाणबुड्यांनी सिडनीवर हल्ला केला.
१९४२ : दुसरे महायुद्ध : लुफ्तवाफेने इंग्लंडमधील कोव्हेन्ट्री गावावर बॉम्बफेक केली.
१९५२ : जनरल ड्वाइट डी. आयझेनहॉवर अमेरिकन सैन्यातून निवृत्त.
१९५२ : संगीत नाटक अकादमी ची स्थापना.
१९६१ : दक्षिण आफ्रिका प्रजासत्ताक झाले.
१९६२ : वेस्ट ईंडीझ संघाचे विघटन.
१९७० : पेरू मध्ये भूकंप. डोंगर कोसळून युंगे गाव नष्ट. ४७,००० ठार.
१९७४ : यॉम किप्पुर युद्ध इस्रायेल व सिरीयामध्ये तह.
१९९० : नेल्सन मंडेला यांना लेनिन आंतरराष्ट्रीय शांतता पुरस्कार जाहीर.
१९९२ : प्रख्यात गुजराती कवी हरिंद्र दवे यांना १९९१ चा कबीर सन्मान मध्य प्रदेश सरकारकडून जाहीर.
२००५ : वॉटरगेट कुभांड : डब्ल्यु. मार्क फेल्टने आपणच डीप थ्रोट नावाने ओळखला जाणारा गुप्त बातमीदार असल्याचे कबूल केले.
२०१० : भारतात मान्यता मिळालेल्या प्रत्येक खासगी शाळेत गरीब मुलांसाठी २५ टक्के जागा राखीव ठेवण्याचा कायदा करण्यात आला होता.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१४६९ : मनुएल पहिला, पोर्तुगालचा राजा.
१५५७ : फियोदोर पहिला, रशियाचा झार.
१५७७ : मुघल शासक बादशाहा जहांगीर यांच्या पत्नी नूरजहाँ यांचा जन्मदिन.
१६४० : मिकाल विस्नियोवीकी, पोलंडचा राजा.
१६८३ : सेल्सियस थर्मामीटरचे शोध लावणारे जीन पियरे क्रिस्टिन यांचे जन्म. (मृत्यू: १९ जानेवारी १७५५)
१७२५ : महाराणी अहिल्याबाई होळकर यांचा जन्म. (मृत्यू: १३ ऑगस्ट १७९५)
१८४३ : भारतातील प्रसिद्ध महाराष्ट्रीयन मराठी नाटककार बळवंत पांडुरंग किर्लोस्कर उर्फ अण्णासाहेब किर्लोस्कर यांचा जन्मदिन.
१८५२ : फ्रान्सिस्को मोरेनो, आर्जेन्टिनाचा शोधक.
१९१० : बालसाहित्यकार, विज्ञानकथाकार भास्कर रामचंद्र तथा भा. रा. भागवत यांचा जन्म. (मृत्यू: २७ ऑक्टोबर २००१)
१९२३ : रैनिये तिसरा, मोनॅकोचा राजा.
१९२८ : पंकज रॉय, भारतीय क्रिकेट खेळाडू.
१९३० : क्लिंट ईस्टवूड, अमेरिकन अभिनेता, चित्रपट निर्माता, दिग्दर्शक.
१९३१ : जॉन रॉबर्ट श्रीफर, अमेरिकन भौतिकशास्त्रज्ञ.
१९३५ : जिम बॉल्जर, न्यू झीलँडचा पंतप्रधान.
१९३८ : जॉन प्रेस्कॉट, युनायटेड किंग्डमचा पंतप्रधान.
१९४३ : ज्यो नेमथ, अमेरिकन ‘फूटबॉल’पटू.
१९६६ : रोशन महानामा, श्रीलंकेचा क्रिकेट खेळाडू.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१४०८ : आशिकागा योशिमित्सु, जपानी शोगन.
१४१० : मार्टिन पहिला, अरागॉनचा राजा.
१७४० : फ्रीडरीक पहिला, प्रशियाचा राजा.
१७९९ : पिएर लेमॉनिये, फ्रेंच अंतरिक्षशास्त्रज्ञ.
१८७४ : प्राच्यविद्या पंडित, पुरातत्त्वज्ञ रामकृष्ण विठ्ठल तथा भाऊ दाजी लाड यांचे निधन. (जन्म: ७ सप्टेंबर १८२२ मांजरे, पेडणे, गोवा)
१९८८ : प्रसिद्ध भारतीय समाजसुधारक व हिंदी भाषिक लेखक संतराम बी. ए. यांचे निधन.
१९८८ : भारतीय राष्ट्रीय पक्षाचे राजकारणी व मध्यप्रदेश राज्याचे माजी मुख्यमंत्री व लेखक पं. द्वारका प्रसाद मिश्रा यांचे निधन.
१९१० : वैद्यकशास्त्रातील पहिली महिला पदवीधर डॉ. एलिझाबेथ ब्लॅकवेल यांचे निधन. (जन्म: ३ फेब्रुवारी १८२१)
१९६२ : एडॉल्फ आइकमन, नाझी अधिकारी.
१९७३ : कथालेखक दिवाकर कृष्ण केळकर तथा दिवाकर कृष्ण यांचे निधन. (जन्म: १९ ऑक्टोबर १९०२ गुंटकल, अनंतपूर, आंध्र प्रदेश)
१९९४ : बनारस घराण्याचे नामवंत तबलावादक पंडित सामताप्रसाद यांचे निधन. (जन्म: २० जुलै १९२१ वाराणसी)
२००२ : सुभाष गुप्ते, भारतीय क्रिकेट खेळाडू, लेग स्पिनर गोलंदाज, त्रिनिदाद येथे.
२००३ : प्रतिभासंपन्न संगीतकार अनिल बिस्वास यांचे निधन. (जन्म: ७ जुलै १९१४)
२००९ : केरळ साहित्य अकादमी पुरस्कार सन्मानित प्रसिद्ध भारतीय इंग्रजी भाषिक कवी तसचं, भारतातील केरळ राज्यातील मल्याळम भाषिक लेखिका कमला दास यांचे निधन.

# भारतीय सैनिकांच्या शौर्याला सलाम करण्यासाठी बीड शहरात रिपाइंची भारत झिंदाबाद तिरंगा रॅली

## पप्पु कागदे यांच्या नेतृत्वाखाली रॅलीमध्ये हजारो कार्यकर्ते सामील

### राष्ट्र गीताने झाली भारत झिंदाबाद तिरंगा रॅलीची सांगता

बीड। प्रतिनिधी

जम्मु काश्मीरमधील पहलगाम येथे निरापराध भारतीय पर्यटकावर दहशतवाऱ्यांनी भ्याड हल्ला करून अठावीस भारतीयांची हत्या केली होती. दहशतवादी हल्ल्याचा बदला घेण्यासाठी भारतीय सैनिकांनी सिन्दुर ऑपरेशन यशस्वी करून पाकव्याप्त काश्मीरमधील दहशत वाद्यांची ठिकाणे उध्दवस्त करुन शंभर पेक्षा जास्त दहशतवादी ठार केले. भारतीय सैनिकांनी अतुलनिय शौर्य दाखवून दहशतवाद्यांना धडा शिकविण्यासाठी सिन्दुर ऑपरेशन यशस्वी केल्याबद्दल रिपब्लिकन पक्षाच्या वतीने भारतीय सैनिकांच्या अभुतपूर्व शौर्याला सलाम करण्यासाठी व शहीद जवानांना अभिवादन करण्यासाठी केंद्रिय मंत्री रामदास आठवले यांच्या. आदेशानुसार शुक्रवार दि.३० मे रोजी युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा रिपाइंचे बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांच्या नेतृत्वाखाली डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून साहीत्यरत्न अण्णाभाऊ साठे पुतळा मार्गे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यापर्यंत भारत झिंदाबाद तिरंगा मोटार सायकल रॅली काढण्यात आली.

या भारत झिंदाबाद रॅलीची सांगता राष्ट्र गीताने झाली. भारतीय सैनिकांच्या शौर्याला सलाम करण्यासाठी व शहीद जवानांना अभिवादन करण्यासाठी युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे यांच्या नेतृत्वाखाली काढण्यात आलेल्या भारत झिंदाबाद तिरंगा रॅलीत महीला, रिपाइं पदाधिकारी व कार्यकर्ते हजारोच्या संखेने सामील झाले होते. बीड जिल्हा रिपाइंच्या वतीने डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्यापासून काढण्यात आलेल्या भारत झिंदाबाद तिरंगा रॅलीत रिपाइं जेष्ट नेते कांतीकुमार जैन, राजू जोगदंड, मझरखान, अशोक साळवे, किसन तांगडे, किशोर कांडेकर, अविनाश जावळे, दीपक कांबळे, महादेव उजगरे, अरुण भालेराव, धोंडीराम सिरसट, लक्ष्मण सिरसट, अरुण निकाळजे, दशरथ सोनवणे, दिपक कांबळे, गोवर्धन वाघमारे, शाहू डोळस, दशरथ शिंदे, रवी जोगदंड, महेश आठवले, प्रमोद दासूद, संदिपान डोंगरे, दिलीप बनसोडे, गौतम बचुटे, अड. सुरेश वडमारे, मायाताई मिसळे, सलमाभाभी, संगीता जाधव, माया वाघमारे, राणी गायकवाड, शोभा गलांडे, राहुल सरवदे, रमेश निशिगंध, निलेश ढोबळे, विलास वाघमारे, मिलिंद तरकसे, आनंद ओगले, बाबा देशमाने, बाळासाहेब ओव्हाळ, अविनाश जोगदंड, विलास जोगदंड, प्रभाकर चांदणे, सुभाष तांगडे , भैय्या मस्के, शाम वीर, आप्पा मिसळे, प्रा.बाळासाहेब गव्हाणे, अक्षय कोकाटे, नागेश दुबळे, चिंटू वडमारे, गौरी वडमारे,अजिंक्य वडमारे,संजय कागदे, प्रभाकर जोगदंड, सतीश शिनगारे, महेंद्र वडमारे, मनोज बोराडे,भैय्या साळवे, संजय हनवते, गौतम कांबळे, सोनू वडमारे, धम्मा पारवेकर, महेश कागदे, अविनाश अवघड, प्रशांत मोरे, नागेश शिंदे, देवानंद वाघमारे, रतन वाघमारे, भाऊसाहेब दळवी, भाऊसाहेब कांबळे, किरण खंडागळे, नवनाथ डोळस, भास्कर जावळे, राहुल कांबळे, नामदेव वाघमारे,रामेश्वर खळगे, सिध्दार्थ वाघमारे, देवानंद वाघमारे, विशाल पवार, दयानंद उबाळे, फुलचंद लुचारे, बंडू ठोंबरे, भीमराव घोडेराव यांच्यासह हजारो रिपाइं कार्यकर्ते भारत झिंदाबाद तिरंगा रॅलीत सहभागी झाले होते.







# आ.संदीप क्षीरसागरांच्या हस्ते बिंदुसरा धरणात जलपूजन

## बिंदुसरा प्रकल्प १०० टक्के क्षमतेने पूर्ण भरला

बीड। प्रतिनिधी

बीड तालुक्यातील पाली येथे असलेला बिंदुसरा धरण प्रकल्प मान्सुनपूर्व पावसानेच १०० टक्के क्षमतेने भरला असून आ.संदीप क्षीरसागर यांच्या हस्ते शुक्रवारी (दि.३०) रोजी बिंदुसरा धरणात जलपूजन करण्यात आले.

मागील काही दिवसांपासून होत असलेल्या सततच्या मान्सूनपूर्व पावसाने बीड शहराला लागून असलेल्या पाली येथील बिंदुसरा धरणात १०० टक्के पाणीसाठा झाला आहे. धरण पूर्ण क्षमतेने भरले असून पाणी ओसंडून वाहत आहे. पावसाळ्यापूर्वीच धरण पूर्ण क्षमतेने भरले असल्याने नागरिक आणि शेतकर्यांमधून समाधान व्यक्त केले जात आहे.

परंतु यासोबतच नदीकाठच्या नागरिकांनी पूरपरिस्थिती संदर्भात सतर्क राहून खबरदारी घेण्याचेही आवाहन आ.संदीप क्षीरसागर यांनी केले आहे. दरम्यान आ.क्षीरसागर यांनी बिंदुसरा धरणाची सुरक्षेच्या दृष्टीने पाहणी केली. यावेळी महसूल विभाग, जलसंपदा विभाग, जायकवाडी विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, पंचायत समिती विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

# अभ्यासातील सातत्यच करिअरचा सक्सेस पासवर्ड

## मोहखेड येथे गुणगौरव सोहळ्यात मान्यवरांचे प्रतिपादन

बीड। प्रतिनिधी

कोणत्याही अभ्यास क्रमाचे शिक्षण घेतांना अथवा स्पर्धा परीक्षांची तयारी करीत असताना विद्यार्थ्यांनी अभ्यासाचे अथक परिश्रम घ्यावेत. कारण याच खडतर प्रवासातून विद्यार्थ्यांना यशाचा मार्ग सापडतो. या यशामुळे आपल्या कुळांचा देखील उध्दार होतो.त्यामुळे अभ्यासातील सातत्यच करिअरचा सक्सेस पासवर्ड आहे. असल्याचे प्रतिपादन मान्यवरांनी व्यक्त केले. धारुर तालुक्यातील मोहखेड येथे नालंदा संघर्षभूमी, राजरत्न युवा मित्रमंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवार (दि.२८) मे रोजी गुणवंत विद्यार्थी गुणगौरव सोहळा आयोजित करण्यात आला होता.त्यावेळी मान्यवर बोलत होते. यावेळी अध्यक्ष म्हणून सत्यशोधक ओबीसी परिषद अध्यक्ष संदिप उपरे तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रा.रमेश सोनवळकर, कास्ट्राईबचे धम्मापाल उघडे, रमेश रुद्रे, डॉ. किरण चक्रे,प्रा.पाराजी शिंपले, ॲड.राजेश शिंदे, वंचितचे अनिल डोंगरे,ॲड.तेजस वडमारे, कृषी विभागाचे मल्हारी जाधव, सुनिल डोंगरे आदी मान्यवर उपस्थित होते.दरम्यान उपविभागीय अधिकारी गौरव इंगोले यांनी व्हिडीओ कॉल करुन विद्यार्थी आणि पालकांशी संवाद साधला.

उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना मान्यवर म्हणाले की, विद्यार्थ्यांनो आपण ज्या युगात वावरत आहोत ते युग अतिशय स्पर्धेचे युग आहे. त्यामुळे करिअर निवड करीत असताना किंवा स्पर्धा परिक्षांची तयारी करीत असताना प्रचंड आत्मविश्वास असला पाहिजे. अगदी नेमकेपणाने निर्णय घेण्याची क्षमता अंगी असली पाहिजे. एवढेच नाही तर विद्यार्थ्यांनो स्वत:शी प्रामाणिकपणा ठेवून अभ्यास केला पाहिजे. त्याचबरोबर आवांतर वाचणावर देखील अधिक भर द्या.नूसते आवांतर वाचन करून भागणार नाही तर त्याच्या नोट्स काढायला शिका. कारण या खडतर प्रवासतूनच एक दिवस तुमच्या आयुष्यात असा नक्कीच येईल की, तुम्ही यशाची गोड फळे नक्की चाखाल. प्रशासन सेवेत रूजु झाल्यावर कुशल प्रशासक म्हणून लौकिक मिळवा. एवढेच नाही तर आपले पद समाजाच्या सदैव कामी आले पाहिजे, असे कार्य नेहमी करीत राहिले पाहिजे.असे प्रेरणादाई मत मान्यवरांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना व्यक्त केले.या कार्यक्रमाचे प्रस्ताविक सुशिलकुमार उजगरे यांनी केले. सुत्रसंचलन प्रतिक्षा उजगरे, शिवानी उजगरे यांनी तर आभार रानबा उजगरे यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी नालंदा संघर्षभूमी, राजरत्न युवा मित्रमंडळ यांनी मोलाचे परिश्रम घेतले.



### यांचा झाला गुणगौरव

दहावी उत्तीर्ण विध्यार्थी अश्विनी उजगरे,बबिता उजगरे,सलोनि उजगरे,समिक्षा उघडे,शरद उजगरे,वैभव उजगरे,कोहिनूर उजगरे, सुमित उजगरे,माऊली कांबळे, अभिजित उजगरे,रोहीनि उजगरे तर बारावी उत्तीर्ण विदयार्थी आनिकेत उजगरे,आदर्श उघडे,तुषार उजगरे,संघर्ष उजगरे,सुजल उजगरे,अमोल उजगरे,प्रणिता उजगरे, कृष्णा वाघमारे,मयुरी उजगरे, प्रतीक्षा उजगरे,प्रतीक्षा उजगरे यांचा गुणगौरव करण्यात आला.

# पालकमंत्री, खासदार,आमदार, जिल्हाधिकारी, मुख्याधिकारी यांनी या रस्त्यावर मोटर सायकल चालवावी

बीड । प्रतिनिधी

शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक ते बलभीम चौक ते माळीवेस चौक पर्यंत रस्त्यांची अत्यंत दुरावस्था झाली आहे. पावला पावलावर खड्डे आणि त्यात साचलेले पावसाचे पाणी यामुळे पादचाऱ्यांसह सर्वच वाहन चालकांच्या नाकी नऊ येत आहे. याचे कुठलेही सोयर सुतक शासन-प्रशासनकर्त्यांना नसल्याने गेल्या अनेक वर्षांपासून जनतेला मोठ्या प्रमाणात हाल अपेष्टा सोसाव्या लागत आहे. या हाल अपेष्टा अनुभवण्यासाठी बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार, खासदार बजरंग सोनवणे, आमदार संदीप क्षीरसागर, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, बीड नगर परिषद च्या मुख्याधिकारी नीता अंधारे यांनी या रस्त्यांवर येवून प्रत्यक्षात मोटरसायकली घेऊन फेरफटका मारत याचा अनुभव घ्यावा तसेच धडाडीचे सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे यांनीही आपल्या अंतराळवीरांसह या रस्त्यांवर येऊन आंदोलन करावे असे आवाहन मुक्तपत्रकार एस.एम. युसूफ़ यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकातून केले आहे.

याविषयी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे की, तत्कालीन जिल्हाधिकारी सुनील केंद्रेकर यांनी त्यांच्या कार्यकाळात या रस्त्यांवर मास्टर प्लॅनची अंमलबजावणी केली होती. तेव्हा या रस्त्याच्या रुंदीकरणासह डांबरीकरण करण्यात आले होते. त्याला आता अनेक वर्षे झाली आहेत. तेव्हापासून आतापर्यंत या रस्त्यांवर पडलेले खड्डे बुजविण्याची तसदी सुद्धा शासन-प्रशासनाकडून घेण्यात आली नाही. यामुळे हा रस्ता आता अत्यंत बकाल अवस्थेत गेला आहे. पावला पावलावर खड्डेच खड्डे पडल्याने पाय ठेवण्यासाठी सुद्धा चांगली जागा मिळत नाही. एकीकडे पादचाऱ्यांचे असे हाल होत असताना दुसरीकडे वाहन चालकांनाही मोठा त्रास सहन करत येथून ये-जा करावी लागत आहे. दुचाकी चालवणाऱ्यांच्या मानेचे व पाठीचे मणके खिळखिळे होत आहे. सध्या पावसाळा सुरू झाला असून गेल्या काही दिवसांपासून दररोज पडणाऱ्या पावसामुळे येथील खड्ड्यांत मोठ्या प्रमाणात पाणी साचून राहत आहे. दुचाकी चालविताना त्यात चाक आदळले की उडणारे पाणी रस्त्यावरून चालणाऱ्यांच्या अंगावर उडत आहे. यामुळे वेळप्रसंगी तक्रारींच्या घटनाही घडत आहेत. मात्र याचे कुठेही सोयरसुतक शासन-प्रशासनकर्त्यांना नसल्याने जनतेच्या त्रासात मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. जनतेचा त्रास कमी व्हावा म्हणून जिल्ह्याचे पालकमंत्री, खासदार, आमदार, जिल्हाधिकारी, मुख्याधिकारी यांनी जातीने येथे येऊन स्वतः प्रत्यक्ष मोटरसायकली चालवून येथील त्रासाचा अनुभव घ्यावा आणि हा रस्ता सिमेंट कॉंक्रीटने लवकरात लवकर चांगला तयार करावा. तसेच शासन-प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी धडाडीचे सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे यांनीही आपल्या अंतराळवीरांसह या रस्त्यावर येऊन एखादे चांगले मोठे आंदोलन करावे असे आवाहन मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकातून केले आहे.

# वसंतदादा पाटील महाविद्यालयात स्वा. सावरकर जयंती साजरी

पाटोदा। प्रतिनिधी

येथील नवगण शिक्षण संस्था संचालित वसंतदादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात २८ मे रोजी स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य प्रोफेसर आबासाहेब हांगे होते. त्यांच्या हस्ते स्वा. सावरकरांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पमाल्यार्पण करण्यात आले. व्यासपीठावर कमवि उपप्राचार्य प्रा. नामदेव चांगण, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. सोमनाथ लांडगे, कृष्णा शेवंते, पोपट गीते, बाबासाहेब नाईकनवरे, बाळकृष्ण गवळी, बाळासाहेब चौरे, रेणुका जाधव, जयराम राऊत, श्रीकृष्ण यादव उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात डॉ. सोमनाथ लांडगे यांनी स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील योगदानाबद्दल थोडक्यात भाष्य केले. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य हांगे यांनी सावरकरांच्या समाजसुधारणा कार्यावर, साहित्यनिर्मिती व स्वातंत्र्य चळवळीतील बहुमोल कार्याचा उल्लेख करत उपस्थितांना मार्गदर्शन केले.

# बाल संगोपन योजनेचा ११५ मुलांना लाभ

## राजेश गवळी यांच्या प्रयत्नाला यश



पिंपळनेर। प्रतिनिधी

बीड तालुक्यातील पिंपळनेर व परिसरातील ११५ विद्यार्थ्यांना महिला व बालकल्याण विभागाच्या बालसंगोपन योजनेअंतर्गत ११५ मुलांना लाभ मिळवून देण्यात आला. यासाठी माजी पं.स. सदस्य राजेश गवळी यांनी प्रयत्न केले होते. त्यांच्या या प्रयत्नाला यश आले असून नुकताच एका कार्यक्रमात हा मंजुरी पत्राचे वाटप करण्यात आले.

पिंपळनेर आणि परिसरातील ज्या मुलांना आई किंवा वडील नाहीत अशा मुलांसाठी महिला व बालकल्याण विभागांतर्गत बालसंगोपन योजना कार्यान्वित आहे या योजनेतून अशा मुलांना आर्थिक लाभ मिळतो परंतु ही योजना अनेक स्थानिक नेत्यांना माहितीच नसल्याने या योजनेचा लाभ ग्रामीण भागातील मुलांना मिळत नाही परंतु संकल्प सेवाभावी संस्थेच्या माध्यमातून माजी पं. स. सदस्य राजेश गवळी यांनी संबंधित पालकांना भेटून विविध कागदपत्राची पूर्तता करून पिंपळनेर येथील ६७ व परिसरातील ४८ मुलांना या योजनेचा लाभ मिळवून दिला आहे. यासाठी अनेक दिवसापासून राजेश गवळी हे प्रयत्न करीत होते त्यांच्या या प्रयत्नाला नुकतेच यश मिळाले असून एका छोटेखानी कार्यक्रमात या मंजुरी पत्राचे वाटप करण्यात आले आहे. या कार्यक्रमाला राजेश गवळी अशोक होळकर, प्रदीप आणेराव, भागवत कदम सह लाभार्थी मुले व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सध्याची राजकीय परिस्थिती पाहता स्थानिक किंवा वरिष्ठ स्तरावरील पुढारी व कार्यकर्ते वैयक्तिक लाभासाठी धडपड करत असतात मात्र २५ वर्षापासून स्थानिक पातळीवर राजेश गवळी यांनी गरिबीची जाणीव ठेवून अनेक गोरगरीब नागरिकांना शासकीय योजनेचा लाभ मिळवून दिला. शेकडो वृद्ध ३४३, श्रावणबाळ ७४९, विधवा २४६, अनाथ मुले १४, बालसंगोपन बीड शहर १००, पिंपळनेर व परिसर ११५ तसेच विद्यार्थ्यांसाठी अहोरात्र परिश्रम घेत आहेत व शासकीय योजनेचा लाभ मिळवून देतात. त्यामुळेच गवळी यांना गरीबाचा नेता म्हणून ओळख निर्माण झाली आहे.

# कर्मविर एकनाथराजी आवाड या विद्रोही पुरस्काराने बाळासाहेब सोनटक्के यांचा गौरव

## प्रतिष्ठेचा असणारा पुरस्कार मिळाल्यामुळे बाळासाहेब सोनटक्के यांचे सर्व स्तरातून कौतुक

तेलगाव। प्रतिनिधी

अतिशय प्रतिष्ठेचा असणारा हा पुरस्कार प्रचंड संघर्ष करून समाजसेवा करणारे निस्वार्थ व्यक्तिमत्व व ओबीसी नेते बाळासाहेब सोनटक्के यांना कर्मवीर एकनाथ रावजी आव्हाड विद्रोही पुरस्कार मिळाल्यामुळे बाळासाहेब सोनटक्के यांचा सर्व स्तरातून कौतुक होत आहे, बाळासाहेब सोनटक्के यांनी सर्व जाती -धर्मातील गोरगरीब गरजू आणि अन्याय अत्याचार ग्रस्त लोकांसाठी सतत निस्वार्थपणे सेवा केलेली आहे. व सध्याही करत आहेत बाळासाहेब सोनटक्के बीड जिल्ह्यातील पंचक्रोशीत नाव असलेला कार्यकर्ता, कधीही ,कोठेही स्वतःच्या अडचणीची पर्वा न करता दुसऱ्याच्या अडचणींना सहज उपलब्ध होणारा, सतत गोरगरीब समाजाच्या मदतीला धावून जाणे हा त्यांचा छंद म्हणावा लागेल .त्यांच्यावर शिव-शाहू -फुले -आंबेडकर -अण्णाभाऊ यांच्या विचारांचा व त्यांच्या कार्याचा प्रभाव दिसून येतो. त्याचबरोबर सामाजिक व वैचारिक विचारवंताच्या सतत सोबत राहून समाजातील कार्य व वंचित उपेक्षित समाजाबद्दलची भावना समजून घेतली. थोर समाज सुधारक स्मूतिशेस हनुमंत काका उपरे व कर्मवीर एकनाथरावजी आव्हाड यांच्या समाजकार्याला त्यांनी जवळून पाहिले असल्यामुळे त्यांच्या कार्याची हातोटी पाहून बाळासाहेब सोनटक्के समाजसेवा करीत आहे.



वंचित उपेक्षित घटकातील जातीय अत्याचार ,शैक्षणिक समस्या व समाजाला आर्थिक व सामाजिक राजकीय समान अधिकार मिळाला पाहिजे व हा उपेक्षित घटक न्यायिक प्रक्रियेमध्ये सहभागी होऊन समता प्रस्थापित झाली पाहिजे यासाठी बाळासाहेब सोनटक्के नेहमीच अग्रेसर असतात जिल्ह्यातील प्रशासनासोबत समन्वय व संपर्कामुळे जनतेच्या अनेक प्रश्न मार्गी लावतात .आजारी व्यक्तीला दवाखान्यापर्यंत घेऊन जाणे, उपचार होईपर्यंत त्याची मदत करणे ,अनेक शालेय विद्यार्थी व महाविद्यालय तरुणांना शाळेत किंवा महाविद्यालयात प्रवेश मिळत नसेल ,विद्यार्थ्यांना कागदपत्र मिळत नसेल तर अशा वेळेस बाळासाहेब सोनटक्के तात्काळ धावून जातात व त्या विद्यार्थ्याला मदत करतात .रेशनिंग प्रश्न असेल पाण्याचा प्रश्न असेल अशा अनेक मूलभूत प्रश्नाच्या संदर्भात ते सतत अग्रेसर असतात. वंचित उपेक्षित घटकाला शिव-शाहू- फुले- आंबेडकर यांचे विचार समजले पाहिजेत राज्यघटनेने दिलेले हक्क व अधिकार त्यांना मिळाले पाहिजे, यासाठी विविध सामाजिक प्रबोधनात्मक कार्यक्रम घेऊन समाजाला परिवर्तनाच्या दिशेने घेऊन जाण्यासाठी यांच्यामध्ये जागृती घडवून आणतात. समाजातील अंधश्रद्धा नष्ट झाली पाहिजे यासाठी अंधश्रद्धा निर्मूलन करण्यासाठी जागृती कार्यक्रम आयोजित करत असतात, वंचित उपेक्षित घटक प्रामुख्याने ओबीसी समाजाला चलो बुद्ध की और या त्यांच्यामध्ये बुद्धाचे व आंबेडकरवादी अभियानात सहभागी करून त्यांच्यामध्ये बुद्धाचे व आंबेडकरवादी विचार रुजले पाहिजे यासाठी अहोरात्र समाजामध्ये मिळून मिसळून राहतात ,ना कुठला स्वार्थ ना कोणताही गर्व फक्त समाजपरिवर्तनाचा ध्यास असणारे बाळासाहेब सोनटक्के या परिवर्तनशील कार्यकर्त्याला कर्मवीर एकनाथराव आव्हाड विद्रोही पुरस्कार देऊन गौरविण्यात आले, कर्मवीर एकनाथराव आव्हाड यांच्या पुण्यस्मृतिदिनानिमित्त दिनांक २५ मे २०२५ रोजी त्यांना हा पुरस्कार देण्यात आला माजलगावचे प्रसिद्ध डॉक्टर आनंदगावकर, छत्रपती सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन श्री मोहन जगताप, जवाहरलाल नेहरू विद्यापीठाचे प्राध्यापक श्री मिलिंद रावजी आव्हाड यांच्या वतीने हा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. या वेळी माजी जिल्हा परिषद सदस्य गयाबाई आवाड.केतकी ताई आवाड.आशोक पालखे. दैनिक आरंभ चे संपादक दिपक भाऊ थोरात.माजी जिल्हा परिषद सदस्य अशोकराव लगड.सचिन उजगरे.राजेश क्षिरसागर धम्मानंद साळवे परमेश्वर आडागळे यांच्यासह मराठवाड्यातील असंख्य कार्यकर्ते व जनसमुदाय उपस्थित होते

# धनंजय मुंडेंच्या प्रयत्नांना यश; धर्मापुरी किल्ला संवर्धनासाठी ३ कोटी ३९ लाख

## अंबाजोगाई येथील बारा खांबी सह खोलेश्वर मंदिरास भरघोस निधी

मुंबई । प्रतिनिधी

माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे यांच्या प्रयत्नांना मोठे यश आले असून आज पर्यटन विभागाकडून परळी मतदारसंघातील प्रसिद्ध धर्मापुरी किल्ल्याच्या संवर्धन व जतन कामासाठी तीन कोटी ३९ लाख रुपयांच्या निधी खर्चनास शासन निर्णयाद्वारे मान्यता देण्यात आली आहे. धनंजय मुंडे यांनी याबाबत सातत्याने मागणी केली होती. बीड जिल्ह्याचे पालकमंत्री असताना धनंजय मुंडे यांनी धर्मपुरी किल्ल्याच्या जतन व संवर्धनासाठी एकूण नऊ कोटी रुपयांची मागणी केली होती त्यापैकी साधारण तीन कोटी ३९ लाख रुपयांच्या निधी खर्च शासन निर्णयाद्वारे आज मान्यता देण्यात आले आहे.



त्याचबरोबर अंबाजोगाई शहरालगत असलेल्या पुरातत्व विभागांनी विशेष भाग म्हणून घोषित केलेल्या सकलेश्वर मंदिर अर्थात बाराखडी नावाने प्रसिद्ध असलेल्या स्थळाच्या विकासासाठी सुमारे ३५ लाख रुपये, तसेच सुप्रसिद्ध खोलेश्वर मंदिर परिसराच्या विकासासाठी सुमारे ४५ लाख रुपये निधी करतात शासन निर्णयाद्वारे मान्यता देण्यात आली आहे. नुकत्याच पार पडलेल्या जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीमध्ये धनंजय मुंडे यांनी धर्मापुरी किल्ल्यासह बारा खांबी मंदिर व खोलेश्वर मंदिर यांच्या परिसराच्या विकासासाठी निधी देण्याबाबत राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित दादा पवार यांना विनंती केली होती.

धर्मपुरी येथील भुईकोट किल्ला हा सुप्रसिद्ध असून पर्यटनाच्या दृष्टीने तो अत्यंत उपयुक्त आहे. मात्र मागील अनेक वर्षांपासून नागरी सुविधांमुळे तो वंचित राहिलेला आहे. या किल्ल्याच्या संवर्धनासह येतील ऐतिहासिक ठेवा जोपासण्याच्या उद्देशाने, तेच प्राचीन महत्त्व असलेले बारा खांबे मंदिर व खोलेश्वर मंदिर यांच्या जीर्णोद्धाराचा व या परिसराच्या विकासाचा प्रश्न मार्गी लावल्यामुळे सर्व स्तरातून धनंजय मुंडे यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

# पाटोद्यात राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंती निमित्त शोभायात्रेचे जल्लोषात स्वागत

पाटोदा । प्रतिनिधी

राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंती निमित्त मालेगाव (जि. नांदेड) येथून निघालेली शोभायात्रा आज पाटोदा



तालुक्यात मोठ्या उत्साहात दाखल झाली. गावातील नागरिकांनी फुलांची उधळण, पिवळ्या ध्वज आणि पारंपरिक वाद्यांच्या गजरात शोभायात्रेचे जोरदार स्वागत केले.

शोभायात्रा पाटोदा शहरात दाखल होताच गावात उत्सवाचे वातावरण निर्माण झाले. जयघोष, ढोल-ताशा, आणि श्रद्धेने ओतप्रोत कार्यक्रम यामुळे संपूर्ण परिसर उत्साहाने भारून गेला होता. गावकऱ्यांनी राजमातांना मनःपूर्वक अभिवादन करत इतिहासातील या तेजस्वी अधिष्ठानाचे स्मरण केले.

ही यात्रा दरवर्षीप्रमाणे चौंडी, जिल्हा अहिल्यानगर येथे पोहोचणार आहे. चौंडी ही राजमातांची जन्मभूमी असून, त्या स्मृतिस्तंभावर दरवर्षी राज्यभरातून यात्रा येते. अहिल्यादेवींच्या कार्याचा जागर आणि त्यांच्या आदर्श शासनव्यवस्थेचा प्रसार हाच या यात्रेचा उद्देश आहे.यात्रेच्या स्वागतासाठी ग्रामस्थ, युवक आणि विविध सामाजिक कार्यकर्ते व नेत्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. या प्रसंगी उपस्थित मान्यवरांनी आपल्या भाषणातून अहिल्यादेवींच्या जीवनकार्याचा गौरव केला.''राजमातांचा आदर्श समाजघडणीसाठी प्रेरणादायी आहे. त्यांचे जीवन म्हणजे सेवा, न्याय आणि त्याग यांचे प्रतीक आहे,''असे मत प्रमुख मान्यवरांनी व्यक्त केले.

# बीड शहरातील मुख्य रस्त्यावर लोकसहभागातून वृक्षलागवड



### डॉ.योगेश क्षीरसागर यांची माहिती; बीडमध्ये सामाजिक संघटनांसोबत नियोजनार्थ बैठक

बीड (प्रतिनिधी)

दि.२९ : राज्याचे उपमुख्यमंत्री व बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजितदादा पवार हे शहरात आल्यानंतर अधिकाधिक वृक्ष लागवड व्हावी, यासंदर्भात आग्रही असतात. त्याअनुषंगाने जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्याशी प्राथमिक चर्चा झाली. पर्यावरण दिनाच्या पार्श्वभूमीवर बीड शहरातील मुख्य रस्त्यावर लोकसहभागातून वृक्ष लागवड करण्यात येणार आहे, अशी माहिती राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांनी दिली आहे.

बीडमध्ये वृक्षलागवडीच्या नियोजनर्थ गुरुवारी (दि.२९) रोटरी क्लब ऑफ मीडटाऊन, आयएमए, पतंजली, क्रेडाई या संघटनांसोबत बैठक झाली. शहरातील मुख्य मार्गावर पहिल्या टप्प्यात एक मार्ग निवडून वृक्ष लागवड केली जाणार आहे. रस्त्यावरील दुभाजक, रस्त्याच्या बाजूला उपलब्ध जागेवर झाडे लावण्याचे नियोजन सुरू आहे. पहिल्या टप्प्यात शहरातील चऱ्हाटा फाटा ते शिवाजी महाराज चौकापर्यंत २० मीटर अंतरावर १ झाड लावण्याबाबत चर्चा झाली. या मोहिमेसाठी अधिकाधिक सामाजिक संघटनांना सहभागी करू, तसेच वैयक्तिक पातळीवर योगदान देणार असल्याचेही डॉ.योगेश क्षीरसागर यांनी सांगितले. त्यांनी राष्ट्रीय महामार्ग विभागाचे अभियंता राजेंद्र भोपळे यांच्याकडून वृक्ष लागवडीसाठी रस्त्याचा एक आराखडा मागविला आहे. या आराखड्यातून वृक्ष लावल्यानंतर ◀◀ पान ३ वर

# दुकाने फोडुन चोऱ्या करणारे सराईत गुन्हेगार पोलिसांच्या जाळ्यात

### माजलगाव शहर पोलीसांची कार्यवाही

माजलगाव । प्रतिनिधी

**शहरात विविध ठिकाणी दुकानाचे शटर वाकवून चोऱ्या करणाऱ्या सराईत गुन्हेगारांना माजलगाव शहर पोलिसांनी पोलीस निरीक्षक राहुल सूर्यतळ यांच्या मार्गदर्शनाखाली अटक केली. त्यांच्याकडून ११ हजार रुपये रोख मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.**

**दि.०४ मे रोजी पहाटेच्या सुमारास माजलगांव शहरातील जुना मोंढा भागातील धनंजय दत्तात्रय धपाटे यांचे ज्ञानराधा मेडीकल दुकानाचे तसेच सुंदरराव सोळके महाविद्यालय समोरील खान कॉम्पलेक्स मधील खुरशीद रशीद शेख यांचे हॉटेलचे शटर कोणीतरी अज्ञात चोरट्याने फोडुन मेडीकल व हॉटेलमधील नगदी ११,०००/- रुपये व**

साहीत्य चोरुन नेले होते.तर दि. ०८ मे रोजी पहाटेच्या सुमारास गोविंद भगवान जाधव यांचे मेन रोड माजलगांव येथील कापड दुकानाचे शटर अज्ञात चोरट्यांनी तोडुन दुकानातील नगदी पाच हजार रुपये व १५ जिन्स पँट असा एकुण २४२५०/- रुपयाचा माल चोरी गेल्याने त्यांच्या तक्रारीवरुन पो.स्टे. माजलगांव शहर येथे गु.र.नं. १७८/२०२५ कलम ३३१ (३), (४),३०५ भारतीय न्याय संहीता प्रमाणे अज्ञात चोरट्यांविरुध्द गुन्हा दाखल झाला होता. व माजलगांव शहरांमधील मेन मार्केटमध्ये दुकाने फोडुन चोऱ्याचे सत्र सुरु झाल्याने व्यापारी वर्गामध्ये दहशतीचे वातावरण निर्माण झाले होते.या प्रकरणी माजलगाव शहर पोलीसांनी तांत्रीकदृष्टया कसुन तपास करुन मुख्य बाजारपेठेत दुकाने फोडुन चोरी करणारे सराईत गुन्हेगार सुरेश अशोक मोरे वय ३० वर्षे रा.लालबाग जालना,विजय कैलास खरे वय ३० वर्षे रा. कन्हैयानगर जालना,आमीत नंदलाल धागडीया रा.खरपुडी ता.जि. जालना,गोपीसिंग प्रल्हादसिंग टाक रा. गुरुगोविंदसिंघ नगर जालना यांना निष्पन्न केले असुन सदर गुन्हयामध्ये सुरेश अशोक मोरे, विजय कैलास खरे या दोघांना अटक करण्यात आली असुन त्यांचेकडुन नगदी ११ हजार रुपये हस्तगत करण्यात आले आहेत.तसेच नमुद आरोपीतांकडे कसोशीने तपास चालु असुन इतर गुन्हे उघड होण्याची शक्यता आहे.सदरची कारवाई नवनित कॉवत पोलीस अधीक्षक,श्रीमती चेतना तिडके, अप्पर पोलीस अधीक्षक अंबाजोगाई यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक राहुल सुर्यतळ, पोलीस उपनिरीक्षक के.बी. माकणे,पोहेकॉ/गणेश नांगरे, पोहेकॉ किशोर जाधव यांनी केली.

# माजी सभापती ॲड. गोविंद फड यांना मातृशोक

परळी । प्रतिनिधी

तालुक्यातील धर्मापुरी येथील सरपंच तथा माजी सभापती ॲड. गोविंद विनायकराव फड व बालाजी फड यांच्या मातोश्री कौशल्या विनायकराव फड यांचे दिनांक ३० मे शुक्रवार रोजी दुखद निधन झाले.



त्यांचा अंत्यविधी स्मशानभूमी धर्मापुरी येथे सकाळी एक दहा वाजता झाला.त्यांच्या अंत्यदर्शनाला व अंत्यसंस्काराला खूप मोठ्या संख्येने जनसागर उपस्थित होता.त्यांच्या पश्चात दोन मुलं, तीन मुली व नातवंड असा मोठा परिवार आहे. मातोश्रींच्या निधनाने आधारवड, मायेचा सागर, आपुलकीचे छत्र हरपल्याने भरून न निघणारी पोकळी निर्माण झाली आहे. त्यांचा मायाळू व प्रेमळ स्वभाव होता.जिव्हाळ्याने ,आपुलकीने सर्वांच्या सुखदुःखामध्ये त्यांचा सहभाग होता. त्यांनी गोरगरिबांना सदैव मदत केली.अनाथांची ,साधू, संतांची, वारकऱ्यांची सेवा केली. लहान मोठ्यांना आदर, सन्मान देऊन सर्वांच्या हृदयात काकू या नावाने आदराचे घर निर्माण केले. राख सावडण्याचा विधी रविवार रोजी सकाळी ठीक सात वाजता स्मशानभूमी धर्मापुरी येथे होणार आहे. त्यांच्या निधनाने धर्मापुरी सह परिसरातून हळहळ व्यक्त होत आहे.

# अवकाळी पावसामुळे जिल्ह्यात हाहाकार तात्काळ मदतीची गरज : मिलिंद सरपते

बीड । प्रतिनिधी

**बीड जिल्ह्यात गेल्या काही आठवड्यांपासून सुरू असलेल्या अवकाळी पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले असून, शेतकरी आणि सामान्य नागरिक मोठ्या संकटात सापडले आहेत. या पार्श्वभूमीवर वंचित बहुजन आघाडीचे बीड शहरातील कार्यकर्ते मिलिंद सरपते यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदन सादर करून तात्काळ मदतकार्य राबविण्याची मागणी केली आहे.**

''अवकाळी पावसामुळे अनेक शेतकऱ्यांच्या शेतातील उभे पीक पूर्णपणे नष्ट झाले आहे. काही घरांमध्ये पाणी शिरल्यामुळे नागरिकांचे संसारोपयोगी साहित्य खराब झाले आहे. गावातील अंतर्गत रस्ते पाण्याखाली गेल्यामुळे नागरिकांची हालचाल ठप्प झाली आहे,'' असे मिलिंद सरपते यांनी निवेदनात नमूद केले.सरपते यांनी प्रशासनाकडे पुढील तीन प्रमुख मागण्या मांडल्या आहेत:१.शेतपिकांच्या नुकसानीचा तात्काळ पंचनामा करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत द्यावी.२.पूरग्रस्त भागात आपत्कालीन सेवा तत्काळ उपलब्ध करून द्याव्यात ३.भविष्यातील आपत्ती व्यवस्थापनासाठी पूर्वतयारी म्हणून उपाययोजना राबवाव्यात. या निवेदनाद्वारे त्यांनी प्रशासनाचे लक्ष वेधून घेतले असून ''नागरिकांचे हाल थांबवण्यासाठी तात्काळ मदतीचे पाऊल उचलावे,'' असे आवाहन वंचितचे नेते मिलिंद सरपते यांनी प्रशासनास केले आहे.

# लढलो नाही तर पिढी वाया जाईल- बाळराजे पवार

## तांदळा उपोषणाला माजी मंत्री पंडित, तहसीलदार यांची भेट

कोळगाव,प्रतिनिधी

वर्षानुवर्षे आपल्या शेतीला पाणी नाही, दुष्काळाने शेतकर्यांसमोर आर्थिक प्रश्न आहेत, आताही आपण शेती पाण्यासाठी लढलो नाही तर पुढील पिढ्याही दारीद्र्यात जातील, त्यामुळे आता शेतीला जायकवाडी धरणाचे पाणी मिळावे यासाठी मोठा लढा दिला पाहिजे, असे प्रतिपादन बाळराजे पवार यांनी तांदळा येथे केले. शुक्रवारी त्यांनी तांदळा येथे भेट देत उपोषणकर्ते अजय पाटील साळुंके यांच्या तब्येतीची विचारपूस केली. यावेळी माजी मंत्री बदामराव पंडित,



### मुख्यमंत्र्यांची भेट घेऊ- पंडित

तांदळा येथे उपोषणकर्त्यांशी बोलताना माजी मंत्री बदामराव पंडित म्हणाले, की जायकवाडी धरणाचे पाणी मिळणे गरजेचे आहे. यासाठी आपण पुढाकार घेऊन उपोषणकर्त्यांचे शिष्टमंडळासह जाऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांची भेट घेऊन मागण्यांसंदर्भात त्यांच्याशी चर्चा करू.

### १४० गावातील शेतकरी उपोषण करतील -गुळवे

गेल्या सहा दिवसांपासून तांदळा येथे सुरू असलेल्या उपोषणाची दखल शासन व प्रशासन पाहिजे तशी घेत नाही. त्यामुळे अजय पाटील यांची प्रकृती खालावली आहे. शासनानी याची योग्य दाल न घेतल्यास १४० गावातील शेतकरी तांदळा येथे उपोषणास बसतील असा इशारा आंदोलनाचे समन्वयक दिनेश गुळवे यांनी दिला.

तहसीलदार संदिप खोमाने यांनीही भेट दिली.

जायकवाडी धरणाचे पाणी मिळावे ◀◀ पान ३ वर

# आ.नमिताताई मुंदडा यांच्या हस्ते सार्थक राऊत याचा सत्कार




बीड । प्रतिनिधी

शालांत व माध्यमिक परीक्षेत यश संपादित केलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार मा. आमदार नमिता ताई मुंदडा यांच्या हस्ते करण्यात आला

आंबेजोगाई येथे नुकत्याच झालेल्या आद्यकवी मुकुंदराज सांस्कृतिक सभागृहात शालांत व माध्यमिक परीक्षेत ९०% च्या वर संपादन केलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा मा. आमदार नमिता ताई मुंदडा यांच्या हस्ते सार्थक दीपक राऊत याचा ९६%०गुण मिळविल्याने त्याचा व इतर गुणवंत विद्यार्थ्यांचा जाहीर सत्कार २८/०६रोजी करून त्यांना सन्मानित करण्यात आले . या कार्यक्रमाला मा. नंदकिशोर (काकाजी) मुंदडा व अक्षय मुडदा विद्यार्थी पालक दीपक राऊत हंसराज राऊत काळेगावकर यांच्या सह विविध क्षेत्रातील मान्यवर बहु संखेने उपस्थित होते.

# प्रशासनातील पारदर्शकतेसाठी तलाठी, मंडळ अधिकारी, महसूल सहाय्यक यांचे 'लाड नको अन् विनंती, राजकीय बदल्यांना पाठबळ नकोच'

## जातीय राजकारणाच्या विळख्यात अडकलेल्या महसूल विभागाला सुधारा-अजय सरवदे

बीड । प्रतिनिधी

जिल्हाधिकारी कार्यालय बीडमध्ये महसूल प्रशासनाच्या पारदर्शकतेबाबत जनतेमध्ये संतापाचा सूर उमटला आहे. तलाठी, मंडळ अधिकारी, महसूल सहाय्यक यांच्याकडून होणाऱ्या पक्षपाती वागणुकीवर आणि त्यांच्या लाडांवर रोष व्यक्त करत, वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष अजय सरवदे यांनी स्पष्ट शब्दांत मागणी केली की, ''तलाठी, मंडळ अधिकारी, महसूल सहाय्यक यांचे लाड नकोच, अन्? राजकीय, आर्थिक बदल्यांना पाठबळ देऊ नका.''

महसूल विभाग हा सामान्य जनतेच्या समस्या सोडवण्याचा मुख्य आधार आहे. मात्र, काही ठिकाणी या विभागातील काही कर्मचाऱ्यांना राजकीय दबाव, आर्थिक हितसंबंध यांच्या प्रभावाखाली काम करताना दिसते, ज्यामुळे सर्वसामान्यांचे नुकसान होत आहे.

### जिल्हा पुरवठा विभागाची तांबडे ''धस'' कटासारखी अवस्था जिल्हाधिकारी पाहतील का?

**अन्न नागरी पुरवठा विभागाने महाराष्ट्रात च्या माध्यमातून असंख्य अधिकारीकर्मचारी यांची भरती केली आहे पैकी २९ अधिकारीकर्मचारी बीड जिल्हा पुरवठा विभागामध्ये नेमणूक झाली परंतु त्यांचेकडे पुरवठा विभागातील कार्यभार न देता महसूल विभागातीलच अधिकाऱ्याकडे पदभार ठेवण्यात आले आहेत. २९ कर्मचाऱ्याच्या नेमणुका झाल्या आहेत त्यांना पुरवठा विभाग सोडून इतर ठिकाणी नेमणूक दिल्या आहेत. हे नियमबाह्य असून जिल्हा पुरवठा विभागातील अधिकारीकर्मचारी यांच्या त्वरित बदल्या कराव्यात यासाठी जिल्हाधिकारी बीड यांना विनंती केली आहे जिल्हाधिकारी बीड काय कारवाई करतात हे पाहू.**

**अजय सरवदे, जिल्हाध्यक्ष, वंचित बहुजन आघाडी बीड (प)**

जिल्हाधिकारी साहेब आपल्याकडून बीड जिल्ह्यातील सर्वसामान्यांच्या अपेक्षा आहेत की प्रशासनातील सर्व कर्मचारी, विशेषतः तलाठी, मंडळ अधिकारी, महसूल सहाय्यक यांचे कार्य मूल्यांकन पारदर्शक पद्धतीने करावे आणि कोणत्याही राजकीय अथवा आर्थिक दबावाला बळी पडू नये. तटस्थ प्रशासन, सर्वांगीण विकास, आणि न्याय व्यवहार हेच ध्येय असावे

प्रशासनातील कामकाज तटस्थतेने आणि सर्वसमावेशक दृष्टिकोनातून व्हावे, मात्र सध्या परिस्थिती उलटी असून, काही ठराविक जात समूहातील अधिकारी कर्मचाऱ्यांना राजकीय दबाव व आर्थिक पाठबळ यांच्या जोरावर महत्वाच्या पदांवर नेमले जात आहे. परिणामी, इतर पात्र कर्मचाऱ्यांना संधी मिळत नसून, जनतेच्या अडचणींवर न्याय्? तोडगा ◀◀ पान ३ वर

# अधिक काळ पाटोद्यात कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांच्या बदल्या कधी होणार?

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील महसूल आणि जिल्हा परिषद विभागातील अनेक कर्मचारी मागील तीन ते पाच वर्षांहून अधिक कालावधीपासून पाटोदा येथेच कार्यरत आहेत. त्यामुळे कर्मचाऱ्यांच्या बदल्या केव्हा होतील याकडे आता संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागून राहिले आहे.नुकतेच बीड जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक यांनी पोलीस विभागातील काही गंभीर निर्णय घेऊन धडाकेबाज कारवाई करत कार्यक्षमता सुधारण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्या या निर्णयाचे जिल्हात सर्वत्र कौतुक होत असून,आता नागरिकांचे लक्ष आहे ते बीड जिल्हाधिकारी व जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे.राज्य शासनाने १८ जून २०२४ रोजी जारी केलेल्या नवीन बदल्यांच्या धोरणानुसार,अवघड व अतिदुर्गम क्षेत्रात

◀◀ पान ३ वर




This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# हगवणेंच्या मामांची उचलबांगडी, जालिंदर सुपेकरांना पुण्यातून हलवलं; गृह विभागातून निघाली बदलीची ऑर्डर



पुणे । प्रतिनिधी

वैष्णवी हगवणे आत्महत्या प्रकरणात दबावतंत्रासाठी नाव आल्यानंतर पुण्याचे कारागृह पोलीस महानिरीक्षक आणि शशांक हगवणेचे मामा जालिंदर सुपेकर यांच्या अडचणीत वाढ झाल्याचं पाहायला मिळालं. त्यातच, भाच्याला बंदुक परवाना मिळवून देण्यासाठी मामा जालिंदर सुपेकर यांनीच मदत केल्याचा आरोपही आजच सकाळी त्यांच्यावर करण्यात आला होता. त्यावर, आपली बाजू मांडताना सुपेकर यांनी सारवासारव केली होती. मात्र, सारवासारव केल्यानंतरही राज्याच्या गृह विभागाने जालिंदर सुपेकर यांची पुण्यातून उचलबांगडी केली आहे. सुपेकर यांना महाराष्ट्र होमगार्ड उपमहासमादेशक पदावर बदली करण्यात आली आहे. दरम्यान, सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी जालिंदर सुपेकर यांच्याविरुद्ध मीडियातून आवाज उठवला होता. त्यानंतर, कारवाईला वेग आल्याचं दिसून आलं.

राज्याच्या गृह विभागाने परित्रक काढून जालिंदर सुपेकर यांची आज बदली केली आहे. महाराष्ट्र पोलीस अधिनियम (१९५१ च्या २२) याच्या कलम २२ न मधील तरतुदींनुसार, पुढील तक्त्यातील स्तंभ (२) मध्ये नमूद भा.पो.से. अधिकारी यांची, स्तंभ (३) मध्ये नमूद पदावरुन स्तंभ (४) मध्ये निर्दिष्ट पदावर, याद्वारे, प्रशासकीय कारणास्तव, बदलीने पदस्थापना करण्यात येत आहे, असे आदेशात म्हटले आहे. त्यानुसार, पुण्यातील कारागृह व सुधारसेवा विशेष पोलीस महानिरीक्षक पदावरुन जालिंदर सुपेकर यांची मुंबईत बदली करण्यात आली आहे. उपमहासमादेशक होमगार्ड, महाराष्ट्र राज्य या पदावर त्यांची मुंबईत बदली करण्यात आली आहे. त्यामुळे, जालिंदर सुपेकर यांना मोठी जबाबदारी देण्यात आल्याचं पाहायला मिळत आहे.

हा शासन आदेश, आस्थापना मंडळ क्र. १ च्या शिफारशींचा यथायोग्य विचार करुन व महाराष्ट्र पोलीस अधिनियम (१९५१ चा २२) याच्या कलम २२ न मध्ये नमूद सक्षम प्राधिकारी यांच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत असल्याचे म्हटले आहे. राज्य सरकारच्या गृह विभागाचे अवर सचिव संदीप ढाकणे यांच्या सहीने हा आदेश पारीत करण्यात आला आहे.

### भाच्याला बंदुक परवान्यसाठी मामांची स्वाक्षरी

जालींदर सुपेकर हे सध्या विशेष पोलीस महानिरिक्षक कारागृह व सुधार सेवा या पदावर कार्यरत होते. तिथुन त्यांची बदली पदावनती करून उप महासमादेशक होमगार्डया पदावर करण्यात आल्याच गृह वाभागाने काढलेल्या आदेशात म्हटलंय. जालींदर सुपेकर हे वादग्रस्त हगवणे बंधुंचे मामा आहेत. त्यांच्याच, सहीने सुशील आणि शशांकला शस्त्र परवाना २०२२ मधे शस्त्रपरवाना मिळाल्याचे एबीपी माझाने समोर आणले होते. याप्रकरणी, हगवणे बंधुंनी परवान्यासाठी खोटेपत्ते दिल्याचा गुन्हा नोंद करण्यात आला.



# सिंहगड किल्ला नागरिकांसाठी तीन दिवस बंद

**पुणे । प्रतिनिधी**

**सिंहगड किल्ल्यावर सध्या अतिक्रमण हटाव कार्यवाही सुरू आहे. ही कार्यवाही अद्यापही सुरूच असल्यामुळे पुढील तीन दिवस म्हणजे दि. ३१ मे ते २ जून या कालावधीत सिंहगड किल्ला सर्वसामान्य नागरिक व पर्यटकांसाठी पूर्णत: बंद राहणार आहे.**

या काळात पायवाटांद्वारे गडावर येणाऱ्या पर्यटकांनाही प्रवेश दिला जाणार नाही. नागरिकांनी व पर्यटकांनी सहकार्य करावे. गडावर जेसीबी किंवा अन्य मोठ्या वाहनांचा वापर शक्य नसल्यामुळे काही स्थायिक रेनफोर्स्ड सिमेंट कॉंक्रीट बांधकामे पूर्णपणे हटवणे बाकी आहे. ही सर्व कामे हातानेच करावी लागत असल्यामुळे कार्यवाहीस अपेक्षेपेक्षा अधिक वेळ लागत आहे. प्रशासन सर्वतोपरी प्रयत्न करत असून ही कार्यवाही लवकरच पूर्णत्वास नेण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे पुणे वन विभागाचे उपवनसंरक्षक महादेव मोहिते यांनी सांगितले.

# अहिल्यादेवी यांनी संस्कृतीचे पुनरुज्जीवन केले; मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले अभिवादन

पुणे : नालायक औरंगजेबाने उद्ध्वस्त केलेली मंदिरे, घाट यांचे पुनर्निर्माण करून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी हिंदू संस्कृतीचे पुनरुज्जीवन केले अशा शब्दात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अहिल्यादेवी यांचे कार्याचे स्मरण केले. अहिल्यादेवी यांच्या नंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काशी विश्वेशर मंदिराचे पुनर्निर्माण केले असेही त्यांनी यावेळी सांगितले



भारतीय युवा मोर्चा वतीने पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जन्मोत्सव सोहळ्यानिमित्त आयोजित युवा प्रेरणा संवाद कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील ,आमदार हेमंत रासने , शंकर जगताप, योगेश टिळेकर, विक्रांत पाटील, भारतीय युवा मोर्चा प्रदेश अध्यक्ष अनुप मोरे आदी उपस्थित होते.

फडणवीस म्हणाले, दुर्दैवाने आपल्याला खरा इतिहास शिकवला गेला नाही. मुघलांचे राज्य जाऊन इंग्रजाची राजवट आली हे खरे नाही. या दरम्यानच्या काळात छत्रपती शिवाजी महाराजांनी स्थापन केलेले हिंदवी स्वराज्य वेगवेगळ्या प्रांतात वेगवेगळ्या स्वरूपात चालविले जात होते. माळवा प्रांतात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी २८ वर्ष राज्य कारभार चालवत तळागाळातील लोकांच्या उत्कर्षासाठी प्रयत्न केले. तसेच परकीय आक्रमकांनी भारतीय संस्कृतीची पाळेमुळे फोडून काढण्याचा प्रयत्न केला. अहिल्यादेवी होळकर यांनी हिंदू धर्माची प्रतीके असलेले घाट, ज्योतिर्लिंग, शक्ती स्थळांचे, भारतीय संस्कृतीचे पुनरुज्जीवन केले.त्यांचे कार्य पुढे नेण्याचे काम आपल्याला करायचे आहे. त्यासाठी राज्य मंत्रिमंडळाने त्यांचे जन्मगाव चौंडी येथे मंत्रिमंडळाची बैठक घेऊन ज्योतिर्लिंग विकासाचा आराखडा तयार केला. राज्यात सक्षम अहिल्यादेवी घडवून महाराष्ट्र प्रगतीपथावर नेण्याचे कार्य करणार, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

# तरुणाच्या हत्येप्रकरणी तिघांना जन्मठेपेची शिक्षा; प्रत्येकी २ लाख रुपये दंड

**पुणे । प्रतिनिधी**

**रस्त्याने चाललेल्या तरूणाला अडवून त्याच्यावर हल्ला करत खून केल्याप्रकरणात तिघांना विशेष न्यायाधीश पी. पी. जाधव यांच्या न्यायालायने जन्मठेपेच्या शिक्षेसह प्रत्येकी दोन लाख रुपये दंडाची शिक्षा सुनावली. अक्षय राजाभाऊ मुळे (वय १९, रा खालुंब्रे, ता. खेड), अनिकेत अंकुश दुडे (वय १८, रा. सुदवडी, देहु फाटा, ता. मावळ) व अतुल दीपक शिंदे (वय २०, रा कांदेवस्ती, इंदोरी, ता. मावळ) अशी शिक्षा झालेल्यांची नाव आहे.**




दंडाच्या रकमेपैकी पाच लाख रुपये मृताच्या कुटुंबियांना देण्यात यावेत. दंडाची रक्कम न भरल्यास सहा महिन्यांचा अतिरिक्त कारावास भोगावा लागेल असेही न्यायालयने निकालात नमूद केले आहे.

२५ मे २०१७ रोजी माळवाडी-तळेगाव रस्त्यावर ही घटना घडली. घटनेत निखिल रामदास पानसरे यांचा खून झाला होता. याप्रकरणी, त्यांचे भाऊ किशोर पानसरे यांनी तळेगाव एमआयडीसी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली होती. घटनेच्या दिवशी निखील हे माळवाडी-तळेगाव रस्त्यावरून जात होते. यावेळी, आरोपींनी त्याठिकाणी येत निखिल यांची अडवून त्यांच्यावर हल्ला केला.

याची माहिती मिळताच किशोर घटनास्थळी पोहोचले. यावेळी, निखील त्यांना रक्ताच्या थारोळ्यात पडलेले तर आरोपी दुचाकीवरून पळून जाताना दिसले. निखील यांना रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. यावेळी, किशोर यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पाच आरोपींना अटक करत त्यांविरोधात दोषारोपत्र दाखल करण्यात आले. आरोपींनी कट रचून हा खुन केल्याचे दोषारोपपत्रात नमूद करण्यात आले होते. याप्रकरणात, सरकार पक्षातर्फे सरकारी वकील चंद्रकिरण साळवी यांनी काम पाहिले. त्यांनी १६ साक्षीदार तपासले. आरोपींनी अत्यंत थंड डोक्याने व कट रचून हा गुन्हा केला आहे. त्यामुळे ते कोणत्याही दयेस पात्र नाहीत असा युक्तिवाद ॲड. साळवी यांनी केला. सरकारपक्षासह न्यायालयाने बचावपक्षाचा युक्तिवाद ऐकून घेत तिघांना जन्मठेप तर दोघांची सबळ पुराव्याअभावी निर्दोष मुक्तता केली. सुटका झालेल्या दोघांविरोधात उच्च न्यायालयात दाद मागण्यात येणार असल्याची माहिती ॲड. साळवी यांनी दिली.

# राष्ट्रवादीच्या माजी शहराध्यक्षाचा मुलगा आणि सासऱ्यावर गुन्हा दाखल

पुणे : राष्ट्रवादी कॉंग्रेसचे माजी शहर अध्यक्ष दीपक मानकर यांच्यांवर बनावट कागदपत्र सादर केल्याप्रकरणी समर्थ पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला होता. यानंतर आता त्यांचा मुलगा करण मानकर आणि त्यांचे सासरे सुखेन शाह यांच्यावर देखील बनावट दस्त तयार केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत वरिष्ठ निरीक्षक उमेश गित्ते यांनी तक्रार दाखल केली आहे.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, रेड हाऊस फाऊंडेशनाचा शंतनू कुकडे यांच्यावर अल्पवयीन मुलीच्या अत्याचारप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात झाला आहे. या प्रकरणी पोलिसांकडून गुन्ह्याचा तपास सुरू असताना कुकडे आणि रोनक जैन यांच्या बँक खात्यावरून लाखोंचा व्यवहार झाल्याचे पोलिसांनी केलेल्या तपासात समोर आले. त्यासंदर्भात पोलिसांनी चौकशी केली असता दीपक मानकर, करण मानकर आणि सुखेन सुरेशचंद्र शहा यांच्या बँक खात्यावर लाखो रुपयांचा व्यवहार झाला असल्याचे समोर आले.

या प्रकरणी करण मानकर यांनी पोलिसांनी सांगितले की डोणजे येथे दुग्ध व्यवसाय सुरू करण्यासाठी शंतनू कुकडे याने पाच कोटी रुपये कर्ज स्वरुपात देणार होता. हे कर्ज पुढील ४० वर्षांसाठी होते. त्यासंदर्भात ५०० रुपयांच्या स्टँपवर करारनामाम देखील झाला होता. अशी माहिती त्यांनी पोलिसांनी दिली होती. मात्र, पोलिसांनी चौकशी केली असता हे दस्त बनावट तयार केल्याचे समोर आले. त्यानंतर पोलिसांनी करण मानकर याच्यासह इतरांवर गुन्हा नोंदवला आहे.

# पालखी सोहळ्यावेळी मेट्रोचे काम बंद ठेवा; देहू संस्थानची आयुक्तांकडे मागणी

देहूगाव : जगद्गुरू संत तुकाराम महाराज ३४० व्या आषाढी पायी वारी पालखी सोहळ्याचे येत्या १८ जून रोजी पंढरपूरकडे प्रस्थान होणार आहे. यानिमित्त पिंपरी-चिंचवड महापालिका आयुक्त शेखर सिंह, पोलिस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी नुकतीच श्रीक्षेत्र देहूगाव येथे भेट देऊन पाहणी केली. या वेळी देहू देवस्थानचे अध्यक्ष विश्वस्त यांच्याशी विविध विषयांवर चर्चा करण्यात आली. महापालिका हद्दीत वारीनिमित्त भक्ती-शक्ती येथून पालखी सोहळा आकुर्डीकडे मुक्कामी जात असताना पालखी सोहळा एका बाजूने, तर काही वारकरी भाविकभक्त दुसर्या बाजूने चालत जात असतात. त्यांना कुठे अडचण होऊ नये, यासाठी रेल्वे मेट्रोचे सुरू असलेले काम आठ दिवस बंद ठेवावे, अशी मागणी केली आहे.

संत तुकाराम महाराज पालखी प्रस्थान सोहळ्यादिवशी महाद्वारातून ३९५ दिंड्यांना प्रवेश द्यावा. या दिंड्या वारकरी भाविक भक्त प्रदक्षिणा घालून नारायण महाराज समाधीकडील दरवाजावाटे बाहेर पडतील. या वेळी भाविकांना दर्शन घेता यावे, यासाठी दर्शनबारीतून मुखदर्शन घेता येईल, अशी व्यवस्था करावी



संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्याचे प्रस्थान झाल्यानंतर हा पालखी सोहळा पहिल्या मुक्कामासाठी इनामदार साहेब वाड्यात येत असतो. या इनामदारसाहेब वाड्याचे प्रवेशद्वार अतिशय लहान आकाराचे आहे. या ठिकाणी भाविकभक्तांची गर्दी होत असते. या गर्दीवर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे.

अनगडशाहबाबा दर्ग्याजवळ विशेष काळजी घ्यावी

परंपरेनुसार पालखी सोहळा इनामदारसाहेब वाडा येथून निघाल्यानंतर पहिल्या समाज आरतीसाठी अनगडशाहबाबा दर्गा या ठिकाणी थांबत असतो. त्यामुळे या ठिकाणी दर्शनासाठी स्थानिक ग्रामस्थांची मोठ्या प्रमाणात गर्दी होते. या गर्दीवर नियंत्र ठेवणे आणि कोणताही अनुचित प्रकार घडू नये, याची काळजी पोलिस प्रशासनाने घ्यावी.

जगद्गुरू संत तुकाराम महाराजांचा पालखी सोहळा दुपारी समाज आरतीसाठी व दुपारच्या विश्रांतीसाठी विसावत असतो. मात्र, या ठिकाणी रस्त्याच्या दुतर्फा मोठ्या प्रमाणात वाहने लावली जातात. त्यावर नियंत्रण ठेवून हा परिसर मोकळा कसा राहील, याची दक्षता घेणे आवश्यक आहे.

जगद्गुरू संत तुकाराम महाराज पालखी सोहळा इनामदारसाहेब वाड्यातून १९ जून रोजी सकाळी लाखो वारकरी भाविकभक्तांच्या उपस्थितीत मार्गस्थ होणार आहे. या दिवशी निगडी ते देहूरोड आणि देहूरोड ते देहू या मार्गावरील दोन्ही बाजूंची वाहतूक बंद ठेवावी; जेणेकरून वारकरी भाविकभक्तांना पायी प्रवास करताना कोणतीही अडचण निर्माण होणार नाही. अशा प्रकारे देहू देवस्थानचे अध्यक्ष, विश्वस्त व पोलिस आयुक्त विनय कुमार चौबे यांच्यात चर्चा होऊन विश्वस्तांनी वरील मागण्या केल्या. यावर सर्व सूचनांचे पालन करून उपाययोजना करण्यात येतील, असे चौबे यांनी सांगितले. या बैठकीस पिंपरी-चिंचवड पोलिस आयुक्त विनय कुमार चौबे, संस्थानचे अध्यक्ष जालिंदर महाराज मोरे, विश्वस्त विक्रमसिंह महाराज मोरे, लक्ष्मण महाराज मोरे, उमेश महाराज मोरे, पालखी सोहळाप्रमुख दिलीप महाराज मोरे, वैभव महाराज मोरे, गणेश महाराज मोरे आदी उपस्थित होते.

# सासूचा खून करणाऱ्या सुनेला जन्मठेप

मावळ : कौटुंबिक वादातून सासूचा गळा आवळून खून केला. त्यानंतर मृतदेह पोत्यात टाकून टेरेसवर ठेवला. सडलेला मृतदेह पतीच्या मदतीने नाल्यात फेकून दिला. ही घटना तळेगाव दाभाडे येथे २०२१ मध्ये घडली. या प्रकरणी पोलिसांनी सून आणि मुलाला अटक केली होती. यातील आरोपी सुनेला जन्मठेप, तर मृत महिलेच्या मुलाला १८ महिने कारावास आणि दहा हजार रुपये दंड अशी शिक्षा सुनावली. वडगाव मावळ सत्र न्यायालयाचे न्यायाधीश जे. एल. गांधी यांनी हे आदेश दिले.

पूजा मिलिंद शिंदे असे जन्मठेप शिक्षा झालेल्या सुनेचे नाव आहे. पूजा हिने वादाचा राग मनात धरून सासूचा गळा आवळून खून केला. त्यानंतर मृतदेह दोन दिवस टेरेसवर पोत्यामध्ये बांधून ठेवला. दिराने, आई कुठे आहे असे विचारले असता,ती माझ्यासोबत वाद करून घरातून निघून गेली, असे पूजाने सांगितले. दरम्यान, शेजाऱ्यांनी तुमच्या टेरेसवरील पोत्यातून घाण वास येत असून ते फेकून द्या, असे सांगितले. पूजा हिने ते पोते नाल्यामध्ये नेऊन टाकले. यासाठी तिचा पती मिलिंद याच्याकडून तिला मदत झाली.

सरकारतर्फे खटल्यामध्ये विशेष सरकारी अभियोक्ता म्हणून स्मिता मुकुंद चौगुले यांची नियुक्ती होती. चौगुले यांनी न्यायालयात वैद्यकीय पुरावे, इलेक्ट्रॉनिक पुरावे याच्यासह साक्षीदार उभे करून युक्तिवाद केला. त्याकरिता त्यांनी सर्वोच्च व उच्च न्यायालयाचे न्यायनिवाडे सादर करत बाजू मांडली. देहूरोड विभागाचे सहायक पोलीस आयुक्त बाळासाहेब कोपनर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रदीप रायन्नावार, तत्कालीन तपासी अधिकारी नारायण पाटील, कोर्ट पोलीस अंमलदार अविनाश गोरे यांनी न्यायालयात पाठपुरावा केला.

# हगवणे कुटुंबाचा आणखी एक कारनामा उघड; चित्रपट दिग्दर्शकाला धमकावल्याचा आरोप

पुणे : वैष्णवी हगवणे आत्महत्या प्रकरणानंतर हगवणे कुटुंबीयांचे अनेक कारनामे समोर येत आहेत. सुनेचा छळ, धमक्या, फसवणूक यांसह आता चित्रपट दिग्दर्शकाला धमकावल्याचा धक्कादायक प्रकार उघड झाला. राजेंद्र हगवणे यांचा पुतण्या संतोष हगवणे याने 'खुर्ची' या मराठी चित्रपटाची निर्मिती केली. या चित्रपटाचे दिग्दर्शक अविनाश खोचरे पाटील यांनी हगवणे यांनी लाखो रुपये थकवल्याचा आरोप केला आहे. विशेष म्हणजे, चित्रपटाचे पोस्टर उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते लॉन्च झाले होते.

अविनाश पाटील यांना हगवणे यांच्याकडून सातत्याने धमक्या मिळत होत्या. संतोष हगवणेने पिस्तूल दाखवत मामा जालिंदर सुपेकर यांच्या पोलीस खात्यातील वजनाचा दबाव टाकला. पाटील यांनी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांसह पुणे पोलिस आयुक्तांकडे तक्रार केली, पण कारवाई झाली नाही.

दरम्यान, जालिंदर सुपेकर यांची पुण्यातील कारागृह विशेष पोलीस महानिरीक्षक पदावरून उपमहासमादेशक, होमगार्ड, मुंबई येथे बदली झाली. हगवणे बंधूंना खोटा पत्ता देऊन शस्त्र परवाना मिळवून देण्याच्या आरोपात सुपेकर यांचे नाव असल्याचा आरोप आहे. या प्रकरणाने पुणे पोलिस दलात खळबळ उडाली आहे.

# निमगाव भोगीच्या ओढ्यात पुन्हा दूषित पाणी सोडले; शरद पवार, उदय सामंत यांचा दौरा ठरला निष्फळ

रांजणगाव : रांजणगाव औद्योगिक वसाहतीतील महाराष्ट्र एनव्हायरो लिमिटेड (एमईपीएल) या कंपनीने पुन्हा निमगाव भोगीच्या ओढ्यात दूषित पाणी सोडल्याने ग्रामस्थांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. अवघ्या पंधरा दिवसांपूर्वी राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत आणि माजी केंद्रीय कृषिमंत्री तसेच राष्ट्रवादी कॉंग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी या समस्येवर तोडगा काढण्याचे आश्वासन दिले होते. मात्र, कंपनीच्या ताज्या कृतीमुळे त्यांचा हा दौरा निष्फळ ठरल्याची खंत निमगाव भोगीच्या सरपंच ज्योती सांबारे आणि माजी सरपंच अंकुश इचके यांनी व्यक्त केली आहे.

दिनांक १५ मे २०२५ रोजी शरद पवार आणि उदय सामंत यांनी निमगाव भोगी ग्रामस्थांच्या विनंतीनुसार रांजणगाव औद्योगिक वसाहतीतील प्रदूषणाच्या समस्येची पाहणी केली होती. यावेळी उद्योगमंत्र्यांनी लवकरात लवकर उपाययोजना करण्याचे आश्वासन दिले होते. या दौऱ्यानंतर एमईपीएल कंपनीने काही काळ ओढ्यात रासायनिक पाणी सोडणे बंद केले होते. परंतु, मागील आठवड्यात झालेल्या मुसळधार पावसामुळे कंपनीच्या कचरा साठवणूक ठिकाणी पाणी साचल्याने गेल्या दोन दिवसांपासून पुन्हा दूषित पाणी ओढ्यात सोडण्यात येत आहे. यामुळे ग्रामस्थांचा भ्रमनिरास झाला असून, त्यांनी तातडीने हा प्रकार थांबवावा, अशी मागणी केली आहे.

यासंदर्भात निमगाव भोगी ग्रामपंचायतीने रांजणगाव एमआयडीसी पोलीस स्टेशन, एमआयडीसीचे उपअभियंता कार्यालय, उपप्रादेशिक अधिकारी जोग सेंटर वाकडेवाडी (पुणे), आणि प्रदूषण नियंत्रण महामंडळ (पुणे) यांच्याकडे तक्रार निवेदन सादर केले आहे. सरपंच ज्योती सांबारे यांनी सांगितले की, ग्रामस्थांच्या आरोग्याला धोका निर्माण करणारे हे दूषित पाणी तातडीने बंद करावे, यासाठी आम्ही प्रशासनाला वारंवार विनंती करत आहोत.